। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २५५ वा । रविवार, दिनांक ०४ जानेवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे




# उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतर युती-आघाडी कागदावरच!

**मुंबई/प्रतिनिधी :** २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया शुक्रवारी पूर्ण झाली. यानंतर राज्यातील राजकीय चित्र अक्षरशः बदलून गेले आहे. कागदावर अस्तित्वात असलेल्या महायुती आणि महाविकास आघाडी यांची प्रत्यक्ष मैदानात पुरती मोडतोड झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे. स्थानिक पातळीवर मित्रपक्षांनीच एकमेकांविरोधात उमेदवार उभे केल्याने यंदाच्या निवडणुका या पूर्णतः बहुपक्षीय आणि बंडखोरीने भरलेल्या ठरणार असल्याचे दिसत आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगरसारख्या प्रमुख महापालिकांमध्ये दोनपेक्षा अधिक आघाड्यांमध्ये थेट संघर्ष होणार असून, अनेक ठिकाणी तर चार-पाच बाजूंनी लढत रंगणार आहे.

**नाशिक** : भाजप स्वबळावर मैदानात उतरला आहे. शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) एकत्र असून, त्यांच्याविरोधात महाविकास आघाडी आणि मनसे एकत्र आले आहेत. शहरात गटबाजीचा मोठा उद्रेक पाहायला मिळतो आहे.

**मालेगाव** : एमआयएम, मालेगाव सेक्युलर फ्रंट, भाजप, शिंदेसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी गट स्वतंत्रपणे लढत आहेत. सर्वाधिक विखुरलेली आणि अनिश्चित लढत येथे आहे.



**अहिल्यानगर :** भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार) युती, शिंदेसेना स्वतंत्र, तर काँग्रेस-राष्ट्रवादी (शरद पवार)-उद्धवसेना एकत्र. युती असूनही तिहेरी संघर्ष अटळ.

**जळगाव :** भाजप आणि शिंदेसेना एकत्र असल्या तरी इतर पक्ष स्वतंत्र. मर्यादित प्रमाणात बंडखोरी दिसून येते.

**धुळे :** भाजप विरुद्ध शिंदेसेना-राष्ट्रवादी (अजित पवार) विरुद्ध उद्धवसेना-राष्ट्रवादी (शरद पवार)-काँग्रेस -मनसे अशी विस्कळीत आघाडी.

**अमरावती विभाग :**

**अमरावती :** भाजप, शिंदेसेना, दोन्ही राष्ट्रवादी, काँग्रेस, बसप, वंचित आणि एमआयएम सर्वच पक्ष स्वतंत्रपणे लढत आहेत.

**अकोला :** भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार) विरुद्ध शिंदेसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी (शरद पवार)-उद्धवसेना-वंचित-एमआयएम असा गुंतागुंतीचा संघर्ष.

पुणे विभाग :

**पुणे :** भाजप स्वतंत्र. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र. काँग्रेस-उद्धवसेना-मनसे एकत्र. शिंदेसेना वेगळी. चार आघाड्या आणि बंडखोरीचा मोठा प्रभाव.

**पिंपरी-चिंचवड :** भाजप विरुद्ध दोन्ही राष्ट्रवादी, तर शिंदेसेना विरुद्ध काँग्रेस-उद्धवसेना-मनसे. सर्वाधिक फाटाफूट.

सोलापूर : भाजप विरुद्ध शिंदेसेना-राष्ट्रवादी (अजित पवार) विरुद्ध महाविकास आघाडी.

**कोल्हापूर :** भाजप-शिंदेसेना-राष्ट्रवादी (अजित पवार) एकत्र असले तरी स्थानिक पातळीवर बंडखोरी. काँग्रेस-उद्धवसेना विरुद्ध.

**इचलकरंजी :** महायुती विरुद्ध शिव-शाहू आघाडी; स्थानिक स्वतंत्र आघाड्यांची उभारणी.

**सांगली-मिरज-कुपवाड :** भाजप, काँग्रेस-राष्ट्रवादी (शरद पवार), शिंदेसेना, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि तिसरी आघाडी पाच बाजूंनी लढत, बंडखोरीचा कळस.

**छत्रपती संभाजीनगर विभाग : विस्कळीत राजकारण**

**छत्रपती संभाजीनगर :** भाजप, शिंदेसेना, उद्धवसेना स्वतंत्र. काँग्रेस विरुद्ध एमआयएम.

**नांदेड :** भाजप-शिंदेसेना विरुद्ध काँग्रेस-वंचित.

**परभणी :** राष्ट्रवादी (अजित पवार) विरुद्ध उद्धवसेना-काँग्रेस आघाडी तुटलेली.

**जालना** : सर्व पक्ष स्वतंत्र. प्रत्येक जागी बहुपक्षीय लढत.

**लातूर :** भाजप विरुद्ध काँग्रेस-वंचित. दोन गट, पण आघाडीचा अभाव.

**कोकण विभाग : बंडखोरीचा उच्चांक**

**मुंबई :** भाजप-शिंदेसेना विरुद्ध उद्धवसेना-मनसे विरुद्ध काँग्रेस-वंचित.

२२७ जागांसाठी १,७२९ उमेदवार; प्रत्येक प्रभागात बहुपक्षीय संघर्ष.

**ठाणे :** शिंदेसेनेचा बालेकिल्ला असूनही भाजप स्वतंत्र. उद्धवसेना, मनसे, काँग्रेस स्वतंत्र. दोन्ही राष्ट्रवादी आमनेसामने.

**नवी मुंबई :** १११ जागांसाठी ४९९ उमेदवार; एकही बिनविरोध नाही. थेट भाजप विरुद्ध शिंदेसेना.

**उल्हासनगर :** भाजप, शिंदेसेना, उद्धवसेना, काँग्रेस, वंचित सर्व स्वतंत्र. ७८ जागांसाठी ४३२ उमेदवार.

**कल्याण-डोंबिवली :** भाजप-शिंदेसेना एकत्र, राष्ट्रवादी (अजित पवार) स्वबळावर, उद्धवसेना-मनसे वेगळी, काँग्रेस स्वतंत्र.

**भिवंडी :** भाजप-शिंदेसेना विरुद्ध काँग्रेस व सपा स्वतंत्र.

**मिरा-भाईंदर :** भाजप विरुद्ध शिंदेसेना थेट संघर्ष. युती फक्त नावापुरती.

**वसई-विरार :** बविआ स्वतंत्र ताकद. भाजप-शिंदेसेना एकीकडे, उद्धवसेना वेगळी. तिरंगी लढत.

**पनवेल :** भाजप-शिंदेसेना विरुद्ध महाविकास आघाडी व इतर पक्ष. अंतर्गत मतभेद कायम.

## राजकीय संकेत काय सांगतात?

मिरा-भाईंदर, नवी मुंबई, कोल्हापूरसारख्या ठिकाणी भाजप आणि शिंदेसेना थेट आमनेसामने आहेत. नाशिकमध्ये भाजप स्वबळावर, तर त्यांच्या विरोधात शिंदेसेना आणि अजित पवार गट एकत्र आहेत. महाविकास आघाडीतही अनेक ठिकाणी फाटाफूट दिसून येत असून, सांगली, अहिल्यानगरसारख्या शहरांत विचित्र राजकीय समीकरणे आकार घेत आहेत. या निवडणुकांमध्ये युती-अघाड्यांपेक्षा स्थानिक गणित, बंडखोरी आणि वैयक्तिक ताकद निर्णायक ठरणार आहे.

# विद्यार्थिनींच्या पुढाकाराने सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव या महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस कु. नेहा सरवदे या प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या जयंती समारंभाची पूर्ण तयारी महाविद्यालयात पदवीच्या वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थिनींनी करून नवीन आदर्श निर्माण केला.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यत कटारे, डॉ. रणजित जाधव, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, प्रा. विवेक कदम, डॉ.विवेक जाधव, डॉ.



शाहूराज मुळे, डॉ.महावीर कटके, डॉ.सुरेशकुमार कांबळे, डॉ. कांतराव पोले, प्रा.विवेक गोस्वामी, डॉ.वैशाली माढेकर, प्रा.शीतल खोत, प्रा.नंदा खरटमल, प्रा. अंकिता वाडकर सर्व प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा, समाजसुधारणेतील त्यांच्या योगदानाचा यावेळी उपस्थितांनी गौरव केला. कार्यक्रमात गायकवाड अंजली, कांबळे कविता, सूर्यवंशी कोमल, मस्के रुपाली, जवादे नेहा, शिंदे प्रांजली, करे रोहिणी, कांबळे अनन्या, बडगिरे भाग्यश्री, सूर्यवंशी प्रणिता, कांबळे दिपाली, गायकवाड नेहा, घोडके प्रतीक्षा, मस्के अपेक्षा, सवारे पूजा या विद्यार्थिनी वक्त्यांनी सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण, समानता व सामाजिक न्याय याविषयीचे विचार आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक असल्याचे नमूद केले. त्यांच्या विचारांवर चालण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. जयंतीनिमित्त महाविद्यालयात सामाजिक जाणीव व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता फुलगामे, नितीन पाटील, जाधव कृष्णा, साखरे गणेश, कांबळे यश, कांबळे आदित्य, उपाडे व्यंकटेश, धामणगावे कृष्णा, इंगळे व्यंकटेश, सुरवसे ओमकार, सुरवसे, ऋषिकेश, थाटे विशाल, भारती निखिल, आमले अभिषेक, आळणे व फुलगामे अजिंक्य यांनी परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# शालेय राज्यस्तरीय विज्ञान प्रयोग स्पर्धेसाठी ज्ञानप्रकाशच्या चि.आरुष शेळके याची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित विविज्ञान प्रयोग प्रदर्शनासाठी ज्ञानप्रकाशचा इ ७ वी तील आरूष शेळके याने प्रयोग सादर केला.

विकसित व आत्मनिर्भर भारत (स्टेम) या अंतर्गत विज्ञान प्रयोग स्पर्धे साठी शाश्वत शेती,कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकला पर्याय,हरित ऊर्जा, उदयोन्मुख तंत्रज्ञान,मनोरंजन गणितीय मॉडेलिंग,आरोग्य आणि स्वच्छता,जलसंवर्धन व व्यवस्थापन हे यावर्षीचे विषय ठेवण्यात आले होते.

तालुका स्तरापासून ते राज्य स्तरापर्यंत वेगवेगळ्या टप्प्यावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

ज्ञानप्रकाश बालविकास केंद्रात कला,क्रीडा,संस्कृती,विज्ञान व तंत्रज्ञान यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात.त्याचा परिणाम म्हणजे विद्यार्थी त्यात विशेष प्राविण्य मिळवत आहेत.

विकसित व आत्मनिर्भर भारत स्टेम या अंतर्गत लातूर तालुका



स्तरिय प्राथमिक,माध्यमिक,दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता विज्ञान प्रयोग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यात ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र,लातूर या शाळेचा प्राथमिक गटातून इयत्ता ७ वी तील चि.आरुष शेळके याचा हरित ऊर्जा या प्रयोगाचा एकूण ८१ विद्यार्थ्यांच्या प्रयोगातून द्वितीय क्रमांक आला.

त्याच प्रयोगास अहमदपूर येथे झालेल्या जिल्हा स्तरिय विज्ञान प्रयोग स्पर्धेत प्राथमिक गटातून (३०) तृतीय क्रमांक क्रमांक मिळाला. जिल्हास्तरिय विज्ञान प्रयोग स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकाच्या प्रयोगांना राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवडले गेले आहे. त्यामुळे ज्ञानप्रकाश बालविकास केंद्रातील इयत्ता ७ वी तील चि.आरुष बालाजी शेळके याच्या प्रयोगाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल ज्ञानप्रकाशचे प्रकल्पप्रमुख सतीश नरहरे, मुख्याध्यापिका तथा संचालिका सविता नरहरे, उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, विभाग प्रमुख प्रशांत शिंदे,विज्ञान शिक्षिका सुचेता चाकूरकर, सविता पाटील ,कोमल डाके व सर्व शिक्षकांनी आयुषचे आणि पालक श्री बालाजी शेळके आणि मनीषा शेळके यांचेही अभिनंदन केले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मुलांना मराठी शाळेत शिकवा: मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष - विश्वास पाटील**

## चिमटा

दयाचा



**निष्ठावंताची बंडखोरी पक्षाला महागात पडणार आहे ! याचा फायदा विरोधकांना मिळणार आहे !!**

# आदर्श जीवनशैली, पौषक आहार, औषधी हीच क्षयरोग मुक्तीची त्रिसुत्री – आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड

**लातूर/प्रतिनिधी :** सध्या भारतात प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र सरकरने क्षयरोगमुक्त भारत करण्यासाठी क्षयरोगाचे उच्चाटनाचे नियोजन केलेले आहे. या अनुषंगाने १ जानेवारी, २०२६ रोजी नवीन वर्षाच्या सुरुवातीस लातूर परिमंडळाच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी निक्षयमित्र बनून ५५ क्षयरुग्णांना दत्तक घेवून त्यांच्या पोषणाची जबाबदारी घेतली.

तसेच आहार किट देण्यासाठी परिमंडळातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व विभाग प्रमुख यांनी स्वतः निक्षय मित्र बनून प्रत्येकी २० ते ५० पोषण आहार किटचे वितरण करावे. जेणेकरून एकही रुग्ण पोषक आहारासाठी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच पोषण आहार किटमधील घटकाचे आरोग्यासाठी उपयोग,



हे सागून आदर्श जीवनशैलीचे कशी असावी, प्रथिनयुक्त पोषण आहार, पुर्ण औषणी कोर्स व व्यसनांपासून मुक्त राहणे या माध्यमातून क्षयरोगमुक्ती मिळवता येते, असे आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी सांगितले.

उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांचा जिल्हा क्षयरोग केंद्राच्यावतीने सेंट्रल क्षेयरोग विभागाकडून प्राप्त प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. सद्यस्थितीत जिल्ह्यात एकूण १ हजार ९५३ क्षयरुग्ण उपचार घेत असून त्यापैकी ४७० रुग्णांना पोषण आहार किट पुरविले आहेत. अद्याप १ हजार ४८४ क्षयरुगण प्रतिक्षेत आहेत. अधिकारी, कर्मचारी तसेच खाजगी संस्था, लोकप्रतिनिधी, उद्योजक व औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी, सीएसआरच्या माध्यमातून जास्तीत जास्त निक्षय मित्र बनवून पोषण आहार आहार किट देण्याचे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पुणे येथील सेवानिवृत्त आरोग्य उपसंचालक डॉ. गायकवाड, लातूर येथील सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, एडीएचएस कुष्ठरोग विभागाचे डॉ. ताबांळे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. सावंत, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, औसाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रेड्डी, तसेच उपसंचालक आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात फ्युएल कंपनीतर्फे 'ए आय विथ पायथॉन' प्रशिक्षण संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बीसीए तृतीय वर्ष तसेच एमसीए प्रथम वर्षातील एकूण १२५ विद्यार्थ्यांसाठी 'ए आय विथ पायथॉन' या विषयावर वीस दिवसीय (१२० तासांचे) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने फ्युएल कंपनीच्या सहकार्याने करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी फ्युएल कंपनीचे शुभम सोनवणे हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते त्यांनी विद्यार्थ्यांना ए आय व पायथॉनचे सखोल मार्गदर्शन केले त्याचबरोबर प्रॅक्टिकल घेऊन प्रोजेक्ट तयार करून घेतले, स्किल डेव्हलपमेंट मॉक इंटरव्यू इत्यादी स्किल चे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमादरम्यान बीसीए तृतीय व एमसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने आय क्यू ये सी समन्वयक डॉक्टर बी.टी.चव्हाण.,बीसीए विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख प्रा. डॉ. वैशाली सातपुते, तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दगडू शेख उपस्थित होते. कार्यक्रम सुरळीत पार पडण्यासाठी बीसीए विभागातील प्रा. प्रसाद पाटील, प्रा. गीतांजली जोशी, आणि प्रा. ज्योती महावरकर यांनी सहकार्य केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालय विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी नेहमीच अशा उपक्रमांचे आयोजन करत असते.


कोठेही व केंव्हाही वाचा latursamachar.com वर
कोठेही वकेंव्हाही वाचा latursamachar.com वर


ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अनेक औषधावर निर्बंध

शासनाने अनेक औषधांवर निर्बंध लादले आहेत. मेडिकल दुकानातून पुर्वी सर्वसाधारण उपचारासाठी गोळ्या मिळत असत. जसे डोके, अंग, खोकला आदि औषधे मेडिकल दुकानातून घेऊन डॉक्टरकडील जाणे टाळत होते. डॉक्टरकडे गेल्यास प्रथम त्यांची फि खिशाला परवडणारी नाही. त्यात विविध चाचण्या केल्यास तर खिसा रिकामा होतो ही एक वस्तूस्थिती आहे. त्यामुळे अनेकजन डॉक्टरकडे न जाता मेडिकल दुकानातून डोके, अंगदुखी आदि प्राथमिक उपचार करीत असतात. अनेकांना आराम वाटतो. आता शिकलेली मंडळी आहे. गुगलवर सर्च करणारी आहे. गुगलला शरण गेल्यास अनेकबाबीचे उत्तरे मिळतात. शिकलेली मंडळींना कोणती गोळी घेतल्यास आराम मिळते याबाबीची माहिती असल्याने सर्रास मेडिकल दुकानातून औषधे घेत असतात ही एक वस्तूस्थिती सर्वत्र पाहाण्यात मिळते. आता सरकारने मेडिकल दुकानातून औषधे मिळण्यात मज्जाव केला आहे. आता डॉक्टरशिवाय औषधे विक्री करण्यात मनाई केली आहे. साधी गोळी सुद्धा डॉक्टरच्या चिट्ठीशिवाय मिळणार नाही. त्यामुळे सर्वसाधारण आर्थिकदृष्ट्या नागरिकांना मोठी आडचण होणार आहे. आलिकडे चुकीचे खोकल्याचे औषधाच्या वापरामुळे जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे सिरफ बंद केले आहे ही चांगली बाब आहे. वास्तविक आपल्या देशात सर्वसाधारण नागरिक राहातात. अनेकांची आर्थिकस्थिती ही हालाकीची आहे. त्यांना रुग्णालयात जाणे परवडत नाही. सरकारी दवाखाना हा सर्वत्र असतोच असे नाही. खाजगी रुग्णालयात जाणे परवडणारे नसते. त्यामुळे खाजगी दवाखान्यात जाण्यापेक्षा एखादी गोळी खाऊन काम चालवु असे विचाराने वागतात. मुळात आपल्या देशात आरोग्य सुविधा आहेत त्या गोरगरीबास पारवडणाऱ्या नाहीत. सर्वात महाग आरोग्य उपचार आहेत. याकडे कोणाचे लक्ष नाही. सरकारचे अजिबात लक्ष दिसून येत नाही. आज खाजगी रूग्णालयात किती मोठ्या प्रमाणात बिल होत आहे. कितीजणाची कट्प्रॅक्टीस सुरू आहे. राज्यात खाजगी रुग्णालयात किती बिल आकारले जाते याचा विचार राज्य सरकारने एकदा करावा. काहीवेळा रुग्ण मृत्युमुखी पडला तरी ऑक्सीजनचा पुरवठा करून जिवंत दाखविले जाते असे वृत्तास प्रसिद्धी दिलेली आहे. मुळात रुग्णालयात दराचे फलक दिसून येत नाही. फिस किती आकारावी या बाबत सरकारचे निर्बंध नाहीत असेल तर केवळ देखावा म्हणून काही ठिकाणी दिसून येतात. रुग्णालयात पाऊल ठेवले तर रक्त, लघवी तपास नंतर विविध चाचण्या केल्या जातात यातच अर्धा खिसा रिकामा होतो. ही एक वस्तूस्थिती आहे ती अनेकांनी अनुभवली देखिल असेल. त्यामुळे रुग्णालयात जाण्यापेक्षा मेडिकल दुकानातून गोळी खावी असे अनेकांना वाटते. हे विज्ञानदृष्ट्या चुकीचे आहे का योग्य आहे? यात न जाता मेडिकल दुकानदार काही चुकीचे देत नाहीत. समोरचा ग्राहक मागतो तोच देत असतो. ग्राहक गोळीचे नाव घेऊन औषध मागतो. त्यावेळी नाविलाजास्तक ग्राहक म्हणून औषधी द्यावी लागतात. सरकारने पहिल्यांदा विचार करावा की, आरोग्य सुविधा ही जनतेला परवडते का? सर्वात महाग न खिशाला न परवडणारी आरोग्य सुविधा आहे तीच जर मोफत केली तरच कशाच्याही भानगड निर्माण होणार नाही. आरोग्य व शिक्षण हे आता सध्याला परवडणारे नाहीत हे मान्यच केले पाहिजे. आज डॉक्टर बनले तर अल्पावधित भव्य रुग्णालयाची उभारणी होते. याबाबत सरकारचे लक्ष नाही. आज उपचार परवडत नाहीत. वाढते बीपी, शुगरे रुग्ण त्यात कर्करोगाचा फैलाव, नको ते रोगाची निर्माण होत आहेत. का होत आहेत किंवा कशामुळे होत आहेत यात न जाता यावरील उपचार हा महागला आहे. परवडणारा नाही हे मान्यच केले पाहिजे. त्यामुळे राज्यात पहिल्यांदा जनतेला माफक दरात रुग्णसेवा मिळाली पाहिजे. दिव्य व भव्य रुग्णालय मोफत उपचार करीत नाहीत. सरकारी दवाखान्यातील डॉक्टर खाजगीत प्रॅक्टीस जोरात करीत आहेत. सरकारी रुग्णालयात आले तर त्याला सायंकाळी खाजगी स्वत:च्या रुग्णालयात बोलावले जाते व आर्थिक बाब वसुल केली जाते हे योग्य नाही. मानवता विसरली जात आहे. त्यामुळे गरीबीमुळे औषधी दुकानातून गोळ्या खरेदी केल्या जातात. रुग्ण रुग्णालयात का जात नाहीत यामागील कारणे कोणती याचा विचार केला पाहिजे. मुळात औषधी सुद्धा महाग आहेत. जेवढे बिल रुग्णालयाचे होते तेवढेच मेडिकल दुकानदाराचे होते हे लक्षात घेतले पहिजे. त्यामुळे जनसामान्यांना आरोग्य सुविधा ह्या परवडणाऱ्या नाहीत. जो पर्यंत आपल्या देशात आरोग्य व शिक्षण पुर्ण मोफत करणार नाही तो पर्यंत देशातील जनता समाधानी दिसणारा नाही. ठराविक रुग्णालय पक्के बिल देतात तर बहुतांशी हे साध्या कागदावर बील देतात हे सरकारला कळत नाही का? गोरगरीब जनसामान्य व्यापाऱ्याकडून दंडासह वसुली होते मात्र कर चुकव्याकडून होत नाही. हे मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे काही जाचक नियम बनविताना दुसरी बाजू समजून घेतली पाहिजे. देशी काय कोणतेही दारू ही आरोग्यास हानीकारक आहे. त्यामुळे लिव्हर खराब होते. शरिरामध्ये एकमेव असा पार्ट आहे की, तो बदलणे अशक्य आहे तो म्हणजे लिव्हर तो दारूमुळे खराब होते असे सांगतात मग दारू का बंद केली जात नाही. कारण त्यापासून मोठ्या प्रमाणात महसुल मिळतो. ही बाब जाहिर का सांगत नाहीत? केवळ काही बाबी जाचक ठरत आहेत. सर्वांना आरोग्य सुविधा मोफत द्या, कोणी मेडिकल दुकानात जाणार नाही. डॉक्टरची तपासणी फि परवडत नाही म्हणून मेडिकल दुकानात डॉक्टरशिवाय औषध मागितले जाते या बाबीचा विचार करणे आवश्यक आहे. केवळ एका बाबीचा विचार करून चालत नाहीत. उपचाराअभावी कितीतरी रुग्ण घरीच काही तरी उपचार करीत असतात. देशात गरीबी आहे. ती संपली नाही. तर देशचालविणाऱ्यांनी विचार करून शिक्षण व आरोग्य मोफत करणे आवश्यक आहे. याचा विचार केला पाहिजे. गरज ज्या बाबीचे आहे तीचा विचार केला तरच देशातील जनता सुखी व समाधानी दिसून येणार आहे.

# सावित्रीबाई फुले : स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक



भारतीय समाजाच्या इतिहासात सावित्रीबाई फुले यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे व प्रेरणादायी आहे. स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतावादी मूल्ये यासाठी आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर त्या एक थोर समाजसुधारक, कवयित्री आणि परिवर्तनाच्या सर्वकालीन प्रतिक आहेत. ज्या काळात स्त्रीने शिकणे पाप मानले जात होते, त्या काळात त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करुन सामाजिक अज्ञानाच्या अंधाराला आव्हान दिले. स्वत:च्या आयुष्याला आकार देतानाच भारतीय स्त्री- शिक्षणाच्या पायाही त्यांनी घातला.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे पाटील हे शेतकरी होते. बालवयातच त्यांचा विवाह महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्याशी झाला. ज्योतिराव यांच्या परिवर्तनवादी झंझावाताला गती देणाऱ्या आदर्श पत्नी म्हणून त्या इतिहासात अमर झाल्या. त्या काळातील रूढीप्रमाणे सावित्रीबाई अशिक्षितच होत्या; मात्र, ज्योतिराव फुले यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. पतीच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रथम घरीच शिक्षण घेतले आणि पुढे पुण्यात शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केले. संस्कृती, शालिनता, शिस्त व आधुनिकता याचा मिलाप म्हणजे सावित्रीबाई फुले.

१८४८ साली पुण्यात भिडे वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू करून सावित्रीबाई फुले यांनी इतिहास घडवला. त्या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. तो काळ स्त्री शिक्षणाच्या विरोधाचा होता. सावित्रीबाईंना शाळेत जाताना रस्त्यावर लोक शिवीगाळ करीत, दगड-शेण फेकत; तरीही त्यांनी हार मानली नाही. त्या शाळेत जाताना नेहमी एक अतिरिक्त साडी बरोबर ठेवत, अपमान सहन करूनही त्या शिक्षणाच्या कार्यात अविरत कार्यरत राहिल्या. त्या शिक्षण घेणाऱ्या, शिक्षण देणाऱ्या आणि शिक्षण प्रसार-प्रचार करणाऱ्या पहिल्या महिला आहेत.

स्त्री शिक्षणासोबतच सावित्रीबाई फुले यांनी दलित, शूद्र-अतिशूद्र अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक शाळा सुरू केल्या. त्यांनी स्त्रियांसाठी, मागासवर्गीयांसाठी आणि दुर्लक्षित घटकांसाठी शिक्षणाची दारे उघडली. समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता यांना त्यांनी निर्भीडपणे विरोध केला. विधवाविवाह, पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंध, अनाथ बालकांचे संगोपन अशा अनेक सामाजिक प्रश्नांवर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मार्ग दाखवला. जातीभेद, धर्मभेद, वर्णभेद साऱ्याच भेदांचा चक्रव्यूह फोडून त्यांनी दीडशे वर्षापूर्वी सर्व धर्म,जात,पंथातील मुलींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला.

सावित्रीबाई फुले या एक संवेदनशील कवयित्रीही होत्या. त्यांच्या कविता समाजप्रबोधन करणाऱ्या होत्या. 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' व अन्य त्यांचे ग्रंथ सामाजिक परिवर्तनाचा संदेश देतात. त्यांच्या लेखनातून शिक्षणाचे महत्त्व, आत्मसन्मान, स्त्री स्वातंत्र्य आणि मानवतावाद यांचा आग्रह दिसून येतो.

सावित्रीबाई फुले यांनी तत्कालिन समाजव्यवस्थेच्या काही अंध रुढी परंपरा पाळल्या नाहीत. त्यासाठी समाजाच्या रोषाला त्या बळी पडल्या. मात्र, आजपासून दीडशे वर्षांपूर्वीचा त्यांचा संघर्ष महिलांसाठी आजही प्रेरणादायी आहेत. त्यांना अपत्य नव्हते. त्याकाळात अपत्य नसणारी माताही समाजाला सहन व्हायची नाही. मात्र, समाजाच्या नावे ठेवण्याची, टोमण्याची पर्वा न करता जैविक मूल नसताना त्यांनी एका विधवेच्या मुलाला दत्तक घेतले. त्याचे संगोपन केले. त्याला पुढे डॉक्टर केले. हा मुलगा देखील त्यांच्यापर्यंत एका क्रांतिकारी निर्णयातून पोहचला. ज्योतिराव आणि सावित्रीबाई यांनी त्या काळात बालहत्या प्रतिबंधक गृह केंद्र सुरु केले. शोषित विधवा, असाह्य, कुमारी मातांना समाजात मरण यातना भोगाव्या लागणारा तो काळ. त्याकाळात या दाम्पत्यांनी हे बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. या आश्रय गृहातील विधवेला झालेला 'यशवंत' हा मुलगा त्यांनी पुढे दत्तक घेतला. त्यामुळे स्वत: निपुत्रिक असणे हे कोणतेही पाप नाही. विधवांना संरक्षण देणे समाजविरोधी नाही. मुलगा दत्तक घेणे ही एक आदर्श उपाययोजना आहे, असा वस्तूपाठ घालण्याचा निर्णय दीडशे वर्षापूर्वी घेतलेल्या सावित्रीबाई आजही आमच्या समाजाला प्रेरणादायी आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांचा सक्रिय सहभाग होता. समाजातील अन्यायग्रस्त घटकांना न्याय मिळावा, समतेवर आधारित समाजनिर्मिती व्हावी, यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालू ठेवले.

१८९६-९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली. त्या काळात समाजातील अनेक लोक आजारी लोकांपासून दूर पळत असताना सावित्रीबाई फुले यांनी मात्र प्लेगग्रस्त रुग्णांची सेवा करण्याचा कणखर निर्णय घेतला. त्यांनी स्वतः रुग्णांना खांद्यावर घेऊन रुग्णालयात दाखल केले. याच सेवाकार्यादरम्यान त्यांना प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी पुण्यात त्यांचे निधन झाले. मानवतेच्या सेवेतील हे त्यांचे शेवटचे पण अत्युच्च बलिदान ठरले.

सावित्रीबाई फुले यांचे जीवन हे संघर्ष, करुणा, धैर्य आणि परिवर्तनाचे प्रतीक आहे. त्यांनी स्त्रीला शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला, समाजाला विचार करायला शिकवले आणि समानतेचा मार्ग दाखवला.

सावित्रीबाई फुले यांचे विचार आणि कार्य आजही तितकेच समर्पक आणि प्रेरणादायी आहेत. शिक्षण, समानता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी त्यांचे जीवन प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरते.

**सावित्रीबाई फुले जीवनपट**

- पूर्ण नाव : सावित्रीबाई ज्योतिराव फुले
- जन्मतारीख : ३ जानेवारी १८३१
- जन्मगाव : नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा, महाराष्ट्र
- वडिलांचे नाव : खंडोजी नेवसे पाटील
- पतीचे नाव : महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले
- कार्य/योगदान : भारतातील पहिल्या महिला शिक्षिका.
- पुणे येथे पहिली मुलींची शाळा (१८४८) सुरू केली.
- स्त्री शिक्षण, दलित शिक्षण व शूद्र-अतिशूद्र समाजाच्या उन्नतीसाठी कार्य.
- बालहत्या प्रतिबंध, विधवाविवाह, स्त्री-पुरुष समानता यांसाठी समाजसुधारणा.
- सत्यशोधक समाजाच्या कार्यात सक्रिय सहभाग
- प्लेग साथीच्या काळात रुग्णसेवा.
- मृत्यू : १० मार्च १८९७
- पुणे, महाराष्ट्र
- (प्लेगग्रस्त रुग्णांची सेवा करताना संसर्गामुळे निधन)
- ओळख :
- भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका
- थोर समाजसुधारिका, कवयित्री व शिक्षणतज्ज्ञ
- महाराष्ट्र शासन व भारत सरकारकडून गौरविलेले व्यक्तिमत्त्व

**प्रवीण टाके**
**उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर (मो.नं -९७०२८५८७७७)**

# ही २ औषधे एकत्र घेणे धोकादायक, नसांमधील रक्त जाईल सुकून

अनेकदा एकाचवेळी दोन वेगवेगळ्या गोळ्या घेणं शरीरासाठी घातक ठरु शकते. शरीरातील पोषकतत्वांची कमतरता भरून काढण्यासाठी याची नक्की मदत होते. पण या दोन गोळ्या शरीरातील नसांमधील रक्त सुकवू शकते.

वयाच्या विशिष्ट वयानंतर शरीरातील पोषकतत्वे कमी होऊ लागतात. अशावेळी बाहेरुन औषधांची मदत घेणे आवश्यक पडते. अनेक औषधे आपली प्रकृती सुधारण्यासाठी घेतली जातात. पण या औषधांचा आपल्या शरीरावर विपरीत परिणाम होत असेल तर ती घेणे टाळली पाहिजेत.

आपल्या शरीरात एकाचवेळी लोह आणि कॅल्शियमची औषधे घेणे धोक्याचे ठरु शकते. न्यूरोलॉजिस्ट डॉ. प्रियंका सहरावत यांनी सांगितल्यानुसार, या दोन पोषकतत्त्वांची औषधे एकत्र घेणे टाळले पाहिजेत. या औषधांचा परिणाम रक्ताच्या पातळीवर आणि त्याच्या प्रवाहावर विपरीत परिणाम होतो.

डॉ. प्रियंका यांनी सांगितले की, लोहाच्या गोळ्या आणि कॅल्शियमच्या गोळ्या एकत्र घेऊ नका. कारण कॅल्शियमच्या गोळ्या लोहाचे शोषण रोखतात. जर तुम्ही लोहाच्या गोळीमध्ये १००ḁ एलिमेंटल आयर्न घेत असाल तर त्यातील ७० ते ८० टक्के पचणार नाही आणि ते बाहेर टाकले जाईल.



जर तुम्ही आयर्न सप्लिमेंट घेत असाल तर ते व्हिटॅमिन सी सोबत घ्या. तुम्ही लोहाच्या गोळ्यांसोबत व्हिटॅमिन सीच्या गोळ्या घेऊ शकता किंवा लिंबूवर्गीय फळांचे सेवन करू शकता. याशिवाय तुम्ही लिंबू पाणी किंवा संत्र्याच्या रसासोबत लोहाच्या गोळ्या घेऊ शकता.

रक्त सुकणे

रक्ताचे कार्य पोषण शरीराला पोहोचवणे असे असते. त्यामुळे शरीराला शक्ती आणि ऊर्जा मिळते. ते तयार करण्यासाठी लोह आवश्यक आहे. जेव्हा शरीराला लोह मिळत नाही तेव्हा रक्त निर्मिती कमी होते. यामुळे ॲनिमिया होऊन अनेक समस्या निर्माण होतात.

शरीरात दिसणारी लक्षणे, पिवळी त्वचा, थकवा, श्वास घेताना त्रास होणे, अचानक वजन कमी होणे, धड धड वाढणे, डोकेदुखी

# महिलांच्या आरोग्यासाठी वरदान आहेत 'या' ४ आयुर्वेदिक वनस्पती, जाणून घ्या फायदे



प्राचीन काळापासून औषधी वनस्पती मानवी आरोग्यासाठी अत्यंत प्रभावी असल्याचे सांगितले जाते. महिलांना अनेकदा , गर्भाशयाचा कर्करोग आणि वंध्यत्व यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते आणि त्या कमी करण्यासाठी औषधी वनस्पतींचा वापर करतात. काही औषधी वनस्पती महिलांसाठी खूप फायदेशीर ठरतात.

आज आम्ही तुम्हाला अशा काही औषधी वनस्पतींबद्दल सांगणार आहोत ज्या महिलांसाठी प्रभावी ठरतात. या वनस्पतींच्या योग्य वापराने औषधांशिवाय बऱ्याच आरोग्य समस्या दूर होण्यास मदत होते. चला जाणून घेऊया या वनस्पती नेमक्या कोणत्या आहेत..

शेवगा-

शेवगा ही महिलांसाठी एक अत्यंत औषधी वनस्पती आहे. जी फक्त ऊर्जाच वाढवत नाही तर हार्मोनल असंतुलन देखील सुधारते. ते खाल्ल्याने हाडे मजबूत होतात आणि सांधेदुखी कमी होते. तुम्ही शेवग्याचा रस, शेवग्याचा सूप पिऊन किंवा कच्चे सेवन करू शकता.

अश्वगंधा-

अश्वगंधा ही पुरुष आणि महिला दोघांच्याही समस्यांवर रामबाण उपाय आहे. तिचे सेवन केल्याने महिलांमध्ये पीसीओएस आणि मधुमेहाचा धोका कमी होतो. ही औषधी वनस्पती महिलांची मासिक पाळी सुधारण्यासाठी आणि प्रजनन क्षमता वाढवण्यासाठी फायदेशीर आहे.

शतावरी-

शतावरी ही महिलांच्या समस्यांवर रामबाण उपाय आहे. याचे सेवन केल्याने पीसीओएस, पीसीओडी आणि हार्मोनल असंतुलन यासारख्या समस्या कमी होतात. याचे सेवन केल्याने महिलांमध्ये मूत्रमार्गाच्या संसर्गाचा धोका कमी होतो आणि शारीरिक सहनशक्ती आणि लैंगिक क्षमता देखील वाढते.

मेथीदाणे-

मेथीदाणे खाणे महिलांसाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. जर तुम्ही गर्भवती असाल तर मेथीदाणे खाणे टाळा. ते रजोनिवृत्ती दरम्यान वेदना कमी करण्यास आणि ब्रेस्टफीडिंग करणाऱ्या आईच्या दुधाचे उत्पादन वाढविण्यास मदत करू शकतात.

# शेपटीसारखी वेणी जाडसर होईल; लांब आणि दाट केसांसाठी घरीच बनवा हे तेल

अनेकांची तक्रार असते की केस खूप गळतात. केस खूप गळल्यामुळे ते पातळ होतात. त्यामुळे केस दाट व्हावे यासाठी ते विविध प्रयोग करतात. अगदी घरगुती उपाय करण्यापासून ते हेअर एक्सपर्ट्सकडे जाण्यापर्यंत अनेक प्रयोग केले जातात. लांब आणि दाट केसांसाठी काही जण अनेक उपचार घेतात, पण यात वापरल्या जाणाऱ्या केमिकलमुळे केसांना पोषण मिळण्याऐवजी त्यांचे सौंदर्य कमी होते.

तुम्हालाही केस पातळ असणे व गळणे या समस्या असतील तर केसांची काळजी घेण्यासाठी तुम्ही आजीने सांगितलेला हा उपाय ट्राय करू शकता. आम्ही तुम्हाला एका घरगुती तेलाबद्दल सांगणार आहोत. हे तेल कसं बनवायचं व या तेलाचे काय फायदे आहेत ते जाणून घेऊयात.

**केस लांब करण्यासाठी कोणत्या गोष्टींचा वापर करावा**

- मोहरीचे तेल
- कांद्याचा रस

केसांना मोहरीचे तेल लावल्याने काय होते

- मोहरीचे तेल केसांसाठी नॅचरल कंडिशनरचे काम करते.
- केसांचे पोषण करण्यापासून ते त्यातला कोरडेपणा कमी करण्यासही ते फायद्याचे ठरते.
- हे नवीन केस येण्यास आणि योग्य पोषण प्रदान करण्यास मदत करते.

कांद्याचा रस केसांना लावल्यास काय फायदा होतो

- कांद्याच्या रसामध्ये भरपूर प्रमाणात सल्फर असतं, जे केस चमकदार आणि दाट होण्यास मदत करते.
- कांद्यात सल्फर असल्यामुळे ते केस पातळ होण्यापासून रोखते.
- कांद्यामध्ये असलेली ॲंटिऑक्सिडंट तत्त्व केसात ओलावा प्रदान करण्यास मदत करतात.

केस लांब करण्यासाठी काय करावे

- सर्वात आधी एका बाउलमध्ये केसांच्या लांबीनुसार लावायला आवश्यक वाटेल तितकं मोहरीचं तेल घ्या.
- एक कांदा बारीक करून त्याचा रस काढा आणि एका वाटीत ठेवा.
- हे दोन्ही चांगले मिसळा आणि हाताच्या बोटांच्या मदतीने टाळूपासून संपूर्ण केसांना लावा.
- हे तेल तुम्ही तुमच्या केसांवर रात्रभर ठेवू शकता किंवा केस धुण्याच्य दोन-तीन तास आधी लावू शकता.
- शॅम्पू आणि कंडिशनरच्या मदतीने केस धुवून घ्या.
- तुम्ही आठवड्यातून दोनदा हा उपाय करू शकता.
- याचा सतत वापर केल्याने तुमचे केस काही काळाने गुडघ्यांपर्यंत लांब होऊ शकतात.

# दररोज दुधासोबत खा मनुके, आरोग्याला मिळतील जबरदस्त फायदे



निरोगी राहण्यासाठी डॉक्टर मनुके आणि दूध खाण्याचा सल्ला दिला जातो. बरेच लोक त्यांच्या आहारात मनुके आणि दूध समाविष्ट करतात. मनुके बहुतेकदा रात्री सेवन केले जातात, तर दूध देखील रात्री सेवन केले जाते. परंतु, जर तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही मनुके आणि दूध एकत्र देखील सेवन करू शकता.

दररोज मनुके आणि दूध एकत्र खाल्ल्याने प्रचंड आरोग्य फायदे होतात. मनुक्यामध्ये व्हिटॅमिन सी, ई, कॅल्शियम आणि लोह यासारखे पोषक घटक असतात. दुधात कॅल्शियम आणि प्रथिनेदेखील असतात. आज आपण दुधासोबत मनुके खाण्याचे फायदे जाणून घेऊया..

हिमोग्लोबिनची कमतरता दूर होते-

एका विशिष्ट वयानंतर शरीरात रक्ताची कमतरता भासू लागते. यामुळे अनेकदा अशक्तपणा येतो. हिमोग्लोबिनची पातळी देखील कमी होऊ लागते. अशा परिस्थितीत, मनुका आणि दूध सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. मनुका लोहाने समृद्ध असतात, जे अशक्तपणा बरा करण्यास मदत करतात आणि अशक्तपणाची लक्षणे देखील कमी करतात.

**हृदयाचे आरोग्य सुधारते-**

निरोगी राहण्यासाठी हृदयाचे आरोग्य चांगले असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दररोज दुधामध्ये मनुके मिसळून खाणे देखील हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. मनुक्यात फायबर आणि पोटॅशियम असते, जे निरोगी हृदय राखण्यास मदत करते. मनुक्यांमधील ॲंटीऑक्सिडंट्स फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून हृदयाचे संरक्षण करतात.

**वजन वाढण्यास फायदेशीर-**

जर तुम्ही फारच सडपातळ असाल आणि वजन वाढवू इच्छित असाल तर तुमच्या आहारात दूध आणि मनुका समाविष्ट करा. मनुके मिसळलेले दूध प्यायल्याने तुमचे वजन वाढण्यास मदत होईल.

**हाडे मजबूत करते-**

दुधात कॅल्शियम आणि प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. म्हणून, दररोज दुधासोबत मनुका खाणे अत्यंत फायदेशीर ठरेल. दुधात मनुका मिसळून खाल्ल्याने हाडे मजबूत होतात. शिवाय, जर तुम्हाला हाडांशी संबंधित काही समस्या असतील तर दूध आणि मनुका एकत्र खाल्ल्याने त्या कमी होतील. दररोज दूध आणि मनुका एकत्र खाल्ल्याने सांधेदुखी आणि सूज यापासूनही आराम मिळू शकतो.

# मोड आलेले की उकडलेले? वजन कमी करण्यासाठी कोणते चणे चांगले?

हरभरा, चणा आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानला जातो. थंडीमध्ये तर हे कडधान्य आवर्जून खायला हवं. चण्यात त्यात तुमच्या शरीराला आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. चण्यामध्ये लोह, प्रथिने, कॅल्शियम, फायबर आणि असे बरेच पोषक तत्त्व असतात

.असे म्हटले जाते की जरी तुम्ही मांसाहारी पदार्थ खाल्ले नाहीत तरी चणे खाल्ल्याने तुमचे प्रथिनांचे प्रमाण कायम राहते. नॉन व्हेज एवढं प्रोटीन तुम्हाला त्यातून मिळेल. म्हणूनच लोक अनेकदा ते त्यांच्या आहारात समाविष्ट करतात. काही लोक चणे मोडनंतर खातात, काही ते उकडल्यानंतर आणि काही ते भाजून खातात. आता प्रश्न असा आहे की चणे खाण्याच्या कोणत्या पद्धतीमुळे सर्वात जास्त आरोग्य फायदे मिळतात. चला हे सविस्तरपणे पाहूया.

**कोणत्या प्रकारचा चणा फायद्याचा?**

एक्सपर्टनुसार तर सगळ्याच पद्धतीचे चणे तुम्हाला फायदेशीर ठरतात. पण मोड आलेल्या चण्यांबद्दल बोलायचं झाल्यास यामुळे पाचन छान राहते. यामुळे गॅसची समस्या कमी होते. कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी फायबर अत्यंत प्रभावी आहे. त्यात पोटॅशियमचे प्रमाणही चांगले असते, जे उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. मोड आलेल्या चण्यामध्ये सर्व प्रकारचे पोषक घटक जास्त असतात कारण ते गरम केले जात नाही.



**उकडलेले चणे**

उकडलेले चणे हे सुद्धा पचनक्रिया चांगले करण्याचे काम करते. ते पचायलाही सोपे असतात, परंतु उष्णतेमुळे त्यांचे पौष्टिक मूल्य मोड आलेल्या चण्यांपेक्षा कमी असते. उकडलेले चणे शरीराला ऊर्जा प्रदान करते आणि वजन कमी करण्यास देखील मदत करते. चणे खाल्ल्याने तुमची भूक कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे तुम्हाला अतिरिक्त कॅलरीजचे सेवन टाळण्यास मदत होते. त्यात लोह देखील असते जे अशक्तपणा दूर करण्यास मदत करते.भाजलेले चणे हे एक आरोग्यदायी, कमी फॅट्स, हाय प्रथिनेयुक्त नाश्ता आहे. ते खाण्याचे अनेक फायदे आहेत, ज्यात हृदयाचे आरोग्य वाढवणे देखील समाविष्ट आहे. मधुमेहींसाठी देखील हे फायदेशीर आहे

# जेवताना मोबाईलवर रिल्स पाहण्याची सवय ठरु शकते घातक

## अभ्यासातून समोर आली धक्कादायक माहिती

तुम्हालासुद्धा जेवताना मोबाईलवर रिल पाहण्याची सवय आहे का? याचं उत्तर हो असेल तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे आणि तुम्ही ही सवय लवकर थांबवली पाहिजे. नेमका हा प्रकार काय आहे जाणून घेऊयात... मोबाईल ही गरज राहिली नसून व्यसन झालं आहे, असं वाक्य एका मराठी चित्रपटात आहे. खरोखरच आज मोबाईल फोन हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग झाला आहे. म्हणजे अगदी छोट्या-मोठ्या कामांसाठी ही पाच इंचाची स्क्रीन आपल्याला आपल्या हातात किंवा खिशात हवीच असते. मग ते फोन कॉलसारखं बेसिक फिचर असो किंवा अगदी जेवताना रिल्स बघणं असो, मोबाईल मस्ट आहे!

सगळं काही रील स्क्रोल करत आपल्यापैकी अनेकजण जेवताना किंवा इतर छोटी-मोठी काम करताना जसं चहा पिताना गैरे निवांत रील स्क्रोल करत बसलेलो असतो. हल्ली ही सवय फार सामान्य झाली आहे. तुम्ही हॉटेलमध्ये बघा किंवा ऑफिस कॅन्टीनमध्ये बघा सगळीकडे अशी मोबाईलमध्ये डोकं खुपसून बसलेली मंडळी दिसतील. मात्र ही सवय अगदी सहज सोपी कृती असून दैनंदिन जीवनाचा भाग झालेली असली तरी त्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. एका नव्या संशोधनामधून हे सिद्ध झालं आहे.



कोणी केलाय हा अभ्यास?

महेल्थलाइनफ्मधील एका आरोग्यविषय अहवालानुसार, बीजिंग विद्यापीठाने रिल्स स्क्रोल करण्यासंदर्भातील विषयावर एक अभ्यास केला. या अभ्यासाच्या निष्कार्षांमधून असे दिसून आले की जेवताना मोबाईल फोन वापरणे किंवा टीव्ही पाहणे शरीरावर फारच नकारात्मक परिणाम करतं.

अहवालात काय होते?

बीजिंग विद्यापीठातील या संशोधनातून असे दिसून आले की, जेवताना मोबाईल फोन वापरणे किंवा टीव्ही पाहिल्याने आपलं लक्ष अन्नापासून विचलित करते. अशाप्रकारे पूर्ण लक्ष अन्नावर न ठेवता ते सेवन केल्याने आपल्या मेंदूला जेवल्याचं समाधान मिळत नाही. आपला मेंदू फोनवर लक्ष केंद्रित करण्यासाठीही बरीच ऊर्जा खर्च करतो. यामुळेच जेवणानंतर तृप्ततेचा संकेत देणाऱ्या हार्मोन्सचे योग्यरित्या उत्सर्जित होत नाहीत. परिणामी, व्यक्तीची भूक हळूहळू कमी होते.

काय परिणाम होतात?

जेवताना लक्ष विचलित झाल्यामुळे अन्नाच्या सुगंधाची आणि चवीची जाणीव कमी होऊ शकते. यामुळे हळूहळू खाण्याचा आनंद कमी होतो. याचा दुरोगामी परिणाम असा होतो की लोक प्रक्रिया केलेले आणि बाहेरील अन्न पसंत करू लागतात. या पद्धतीनं बराच काळ राहिल्यास चयापचयावर परिणाम होतो, ज्यामुळे शेवटी आरोग्य बिघडते. यामुळे लठ्ठपणाचा धोका वाढतो.

या समस्याही बळावतात

जेवणादरम्यान जास्त स्क्रीन टाइममुळे केवळ लठ्ठपणाच वाढतो असे नाही तर मधुमेह, उच्च रक्तदाब या सारख्या दीर्घकालीन आजारांचा धोका देखील वाढतो. याचसंदर्भातील अजून एक समस्या म्हणजे एकाग्रतेचा अभाव! हल्ली हा अभाव लोकांमध्ये खूप दिसून येतो. या एकग्रतेच्या अभावामुळे एक तर लवकर किंवा खूप हळू जेवण जातो. यामुळे टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब आणि मूत्रपिंडाच्या समस्यांचा धोका वाढतो. शिवाय, याचा जीवनशैलीवरही परिणाम होतो.

आता हे एवढे तोटे पाहता जेवताना मोबाईल दूर ठेवलेलाच बरा, नाही का?

# दीदींची मंदिर खेळी



अल्पसंख्याकांचा आपण अनुनय करतो हा आरोप फेटाळण्यासाठी ममता दीदी मंदिर उभारणीस महत्त्व देत आहेत. त्यामुळे आपल्या मतपेढीत फूट पडण्याची व जागा गमावण्याची भीती भाजपला वाटत आहे. पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीचे वाता-वरण तापू लागले आहे. केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा तीन दिवस कोलकात्यात तळ ठोकून होते. पक्षाचे आमदार-खासदार यांच्याशी त्यांनी चर्चा केली. त्याखेरीज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांचीही भेट घेतली. राज्यात भाजप दोन तृतीयांश जागा जिंकेल, असे त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीरही केले. तामिळनाडूप्रमाणेच पश्चिम बंगालमध्ये यश मिळत नसल्याची सल भाजपला बोचत आहे. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी २०११ मध्ये राज्याची सत्ता हस्तगत केली, तेव्हापासून त्यांची राज्यावरील पकड घट्ट आहे. भाजप त्यांच्यासमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न करत आहे; पण ममता दीदींच्या किल्ल्यास छोटे खिंडार पाडणेही त्यांना जमलेले नाही. गेल्या एप्रिलमध्ये दिघा या किनारी गावात जगन्नाथ मंदिराचे उद्घाटन त्यांनी केले. गेल्याच आठवड्यात कोलकात्यात एका मंदिर समूहाचे भूमिपूजन त्यांनी केले. दुर्गादेवीस हा समूह समर्पित असणार आहे. सिलिगुडीमध्ये महाकाल मंदिराची उभारणीही होणार आहे. एकूणच मंदिर प्रकल्पांचा धडाका ममता दीदींनी लावला आहे. दीदींच्या विरोधकांची विशेषत: भाजपची यामुळे पंचाईत झाली आहे. टीका करण्यासाठी ते मुद्दे शोधत आहेत.

भाजपची पंचाईत

डाव्यांना सत्तेतून हुसकावून लावण्याचा चमत्कार ममता यांनी करून दाखवला. त्यानंतर प्रत्येक निवडणुकीत पक्षाच्या जागा त्यांनी वाढवत नेल्या. एकेकाळी काँग्रेसची या राज्यात सत्ता होती हे खरे वाटू नये अशी स्थिती त्यांनी आणली. डावे पक्षही नावापुरते उरले आहेत; मात्र भाजपने आपल्या जागा वाढवल्या आहेत. २०१४ मध्ये केंद्रात भाजपची सत्ता आल्यानंतर या पक्षाची पश्चिम बंगलमध्ये स्थिती सुधारली हा महत्त्वाचा मुद्दा आहे. केंद्रातील सत्तेमुळे साधन सामग्री व पैसा उभारणे भाजपला शक्य झाले. ममता बॅनर्जी मुस्लिमांचा अनुनय करतात हा भाजपच्या टीकेचा मुख्य मुद्दा राहिला आहे. मुस्लिम समाजातील विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप अशा काही योजना ममता यांनी राबवल्या. त्यामुळे या टीकेस बळ मिळाले. मुर्शिदाबाद व अन्य जिल्ह्यांत धर्मांध गटांनी हिंदूंवर हल्ले केल्याचे निमित्तही आहे. पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना दुय्यम नागरिकांची वागणूक मिळते, असा प्रचार त्यामुळे संघ परिवाराने सुरू केला. उत्तर प्रदेशासारख्या राज्यांत उजव्या विचारांचे गट अल्पसंख्याकांवर हल्ले करतात तेव्हा भाजप हा हिंदू समाजाचा अनुनय करतो असे म्हणता येते. हैदराबादमध्ये पसमिंदा मुस्लिमांची मते खेचण्यासाठी भाजप प्रयत्न करतो त्यास मुस्लिमांचा अनुनय न म्हणता 'सामाजिक अभिसरण' असे नाव संघ परिवार देतो. ममता दीदींवर कितीही टीका केली तरी हिंदु मतद-ारही तृणमूल काँग्रेसला मते देतात, असे काही अभ्यासांतून समोर आले आहे. ढोबळ मानाने हिंदु मतांपैकी सुमारे एक पंचमांश मते तृणमूलकडे वळल्याचे एका पाहणीत आढळले आहे. सुधारित नागरिकत्व कायदा, मतदार याद्यांची विशेष पडताळणी या मुद्द्यांवर ममता दीदी भाजपला धारेवर धरत आहेत. ममता दीदी चर्चमध्ये, शिखांच्या गुरुद्वारांत जातात, त्या खर्या अर्थाने धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) आहेत असे तृणमूलतर्फे सांगितले जात आहे. आपल्यावरील मुस्लिम अनुनयाचा शिक्का पुसण्यासाठी ममता दीदींनी मंदिरांच्या उभारणीत लक्ष घातले हे उघड आहे. त्यामुळे भाजपची पंचाईत झाली आहे. हिंदुत्व व मंदिरे हा आपला प्रांत आहे. किंबहुना आपली मक्तेदारी आहे, असा भाजपचा ठाम समज आहे. अयोध्येत राममंदिर एका विश्वस्त संस्थेने उभारले आहे, असे सर संघचालक मोहन भागवत यांनी म्हटले आहे; पण लालकृष्ण अडवानी यांच्यापासून भाजपच्या अनेक नेत्यांनी, तसेच संघाच्या अनेक कार्यकर्त्यांनी राम मंदिर आंदोलनात भाग घेतला याची नोंद आहे. ममता यांनी मंदिराच्या क्षेत्रात प्रवेश केल्याने भाजपला त्यांच्यावर टीका करणेही अवघड जात आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ममता यांची ही चतुर खेळी कितपत यशस्वी ठरते ते लवकरच दिसेल.

## डॉक्टर टीप्स

### या वयात महिला होऊन जातात अधिक



परंतू सक्रिय स्त्रियांचे मानसिक, शारीरिक आरोग्य अपेक्षाकृत उत्तम दिसून आले. या महिलांसाठी सेक्समध्ये रस नसणे हा विषय काळजी करण्यासारखा मुळीच नव्हता. ६० टक्के महिला ज्या नियमित संबंध स्थापित करू पात नसल्या तरी संतुष्ट आणि खूश दिसल्या.

शोधात हे देखील कळून आले की चाळिशीनंतर महिलांची सेक्स लाईफ अधिक चांगली असते. यात सामील ४५ ते ५० वयाच्या महिलांपेक्षा ८० हून अधिक वयाच्या बायका आपल्या सेक्स लाईफने संतुष्ट होत्या.

तर वयस्कर महिलांच्या संतुष्टीचे रहस्य काय?

हे जाणून घेण्यात सर्वांना उत्सुकता आहे नियमित संबंध नसले तरी जेव्हा ही इच्छा होते

## विनोद




गंपू: लोक चार दिवस दारू पितात आणि म्हणतात की , व्यसन लागलं...

. .

आम्ही वर्षानुवर्ष अभ्यास करतोय , पणव्यसन लागत

## संदेश

Aaj Titanic ki 95th Anniversary hai,

Isliye Sache Premi "Jack & Rose" ki Yaad me Apne Mobile ko Pani me 2 Minute Dibokar Ra-khen,

Unki Aatma ko Shanti Milegi...

## सुविचार


माणसाला सुख हवं असते पण सुख देणारे पदार्थ नको असतात. दु:ख देणारे पदार्थ हवे असतात पण दु:ख नको असते.- ओशो

### संस्कृत सुभाषित

बुभुक्षितैव्यकिरणं न भुज्यते । पिपासितै: काव्यरसो न पीयते ।
न च्छन्दसा केनचिदुद्धृत कुलं । हिरण्यमेवार्जय, निष्कला गुणा:

।अर्थ : ज्याला कडकडून भूक लागलेली आहे, त्याला व्याकरणाच्या भोजनाचा उपयोग नसतो, जो तहानलेला आहे, त्याची तहान काव्यरसाने भागत नाही (भुकेला भोजनच लागते व तहानेला पाणीच लागते), तसेच वेदांचा अभ्यास करून कुळाचा उद्धार होत नाही तर संपत्तीशिवाय (सोन्याशिवाय) सारे गुण हे निष्फळ ठरतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. सिंह
३. भडीमार
६. महालक्ष्मीची नगरी
७. सारखे खाण्याची इच्छा
८. नवरदेव
९. लाडवाचा शाही प्रकार
१०. निवासस्थान
११. दरोडेखोर
१२. आनंदावर पडल्यास मनोभंग
१४. सर्प
१६. सकस
१८. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींवरबरोबर आलेला फौजफाटा
२१. प्रत्युत्तर
२४. विष्णूपत्नी
२५. हवेतील शीतलता
२७. वैरी, दावा दाखल करणारा
२८. फटाक्यांत ठासली जाणारी
२९. दुसऱ्यावर केलेले उपकार
३०. विनिमयाचे देशानुसार बदलणारे साधन
३२. नेस्तनाबूत
३३. पांग, मेहरबानी
३५. अगदी नियमित
३८. दगा, हानी
४०. कवितेतील एक शब्दालंकार
४१. ही केवळ 'र' ला 'ट' जुळवल्याने होत नाही!
४४. बारीकसारीक
४७. शरम
४९. उलटीपूर्वीची अवस्था
५१. आवडता, प्रिय
५२. गवत कापण्याचे, उपटण्याचे साधन
५५. दुमड घातलेली करंजी
५८. कुरकूर, अतिश्रम
५९. ध्यान लावणारा पक्षी
६१. देवालयातील गाभारा भरून टाकणारा आवाज
६२. वेळी-अवेळी, रात्री-अपरात्री
६४. गव्हाचे बारीक पीठ
६५. नाश्तापाणी
६६. आरतीसाठीचे वाद्य
६७. पुरुषश्रेष्ठ
६८. लक्ष्मीनारायण

## उभे शब्द

१. पिवळसर रंगाचे काटेरी सुगंधी पान
२. मंत्रीमंडळ
३. महाशिरात्रीचा महिना
४. सीतेला पळवून नेणारा
५. अफूचे बी
६. कारल्याची चव
६अ. नैसर्गिक भुयार
७. हिंदीत खत
७अ. आचारी
९. रात्रभर
१०. हल्ली हे दिवस केवळ गोंगाट आणि खरेदीचे!
१३. पाणी
१५. समाजातील प्रतिष्ठा
१६. थडगे
१७. रक्त देणे
१९. सैन्यातील एक हुद्दा
२०. किल्लीचा जोडीदार
२१. विविध प्रकाराने
२२. जागृत
२३. अर्थसंकल्प
२६. लायब्री (मराठी)
३१. केसांची बट
३४. आकाशपोकळी
३५. शेवट करणे, तडीस नेणे (वा.प्र.)
३६. विचार, हेतू
३७. सौनग वठवणारा
३९. सावकार, श्रीमंत
४२. निर्मळ
४३. हा सगळ्यांनीच सोडल्यास बेबंदशाही!
४५. अस्थि
४६. सततचे नाकारणे
४८. लोक, प्रजा
५०. औरंगाबादची प्रसिद्ध वास्तु- 'बीबी का ----'
५३. मृत्यूचा राजा
५४. तारणारा
५६. केशकर्तनालयातील साधन
५७. शाश्वत
६०. कातरलेले तुकडे
६३. शिवाय, वाचून
६४. चालू दिवस
६५. स्वाद, रूची
६५अ. रचल्यास ढीग

## आडवे उत्तर

१.केसरी ३.मारा ६.करविर ७.खा खा ८.वर ९.राघवदास लाडू १०.सदन ११.डाकाईत १२.विरजण १४.साप १६.कसदार १८.लवाजमा २१.परतजाब २४.रमा २५.गारवा २७.दावेदार २८.दारू २९.परोपकार ३०.चलन ३२.नायनाट ३३.उपकार ३५.नित्यनेमाने ३८.घात ४०.यमक ४१.कविता ४४.लहानसहान ४७.लाज ४९.मळमळ ५१.लाडका ५२.कोयता ५५.कानवला ५८.मरमर ५९.बक ६१.घंटानाद ६२.रातबिरात ६४.आटा ६५.चहाफराळ ६६.झांज ६७.नरवर ६८.रमारमण

## उभे उत्तर


१.केवडा २.सरकार ३.माघ ४.रावण ५.खसखस ६.कडू ६अ.विवर ७.खाद ७अ.खानसामा ९.रातसार १०.सणवार १३.जल १५.पत १६.कबर १७.रक्तदान १९.जमादार २०.कुलूप २१.पर-ोपरीने २२.जागा २३.अंदाजपत्रक २६.वाचनालय ३१.लट ३४.अंतराळ ३५.निकाल लावणे ३६.मानस ३७.नकलाकार ३९.धनको ४२.विमला ४३.ताळ ४५.हाड ४६.नकारघंटा ४८.जन ५०.मकबरा ५३.यम ५४.तारणहार५६.वस्तरा ५७.सनातन ६०.कतरण ६३.बिगर ६४.आज ६५.चव ६५अ.रास




# हिरो नंबर १ करणार चित्रपटसृष्टीत पुनरागमन

## गोविंदानं केला मोठा खुलासा...

मुंबई -अभिनेता गोविंदा हा अनेक वर्षापासून चित्रपटसृष्टीपासून दूर आहे. त्याला त्याचे चाहते रुपेरी पडद्यावर पाहण्यासाठी खूप उत्सुक आहेत. दरम्यान गोविंदा हा सलमान खान स्टारर 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटामध्ये कॅमिओ करताना दिसणार आहे. अलीकडेच एका कार्यक्रमात गोविंदानं तो लवकरच पुनरागमन करणार असल्याची माहिती आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली. दरम्यान त्याचा एक सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामध्ये तो म्हणताना दिसत आहे, ''मी तुम्हाला असे काही सांगणार आहे, जे मी यापूर्वी कधीही सांगितले नव्हते. आता वेदना आणि भीती गेली आहे. आता तुमचा हिरो, जो हिरोमधून 'हिरो नंबर १' बनला आहे, तो पुन्हा येत आहे. तुमचे प्रेम नेहमीच माझ्याबरोबर राहो.''



गोविंदा करणार चित्रपटसृष्टीत पुनरागमन : आता गोविंदाचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप पसंत केला जात आहे. त्याला

### बॅटल ऑफ गलवान या चित्रपटाम ध्ये कॅमिओ करताना दिसणार

आता प्रेक्षक नवीन अंदाजामध्ये पाहण्यासाठी खूप उत्सुक आहेत. कार्यक्रमामध्ये गोंविदानं जय श्री राम आणि जय बजरंग बली असाही जयघोष केला. याशिवाय त्यानं पुढं म्हटलं, ''मी तुमच्या सेवेत आहे. मी तो गोविंदा आहे, जो गरिबीमधून आला आहे. माझ्याकडे कधीही कोणत्याही प्रकारचे नियोजन नव्हते, फक्त देव आणि माझ्या पालकांच्या आशीर्वादानं मला गोविंदापासून गोविंदा बनवले. तुम च्या प्रेमानं ते केलंय. तो गोविंदा परत येत आहे. हनुमान तुम्हाला आशीर्वाद देवो.'' तसेच या कार्यक्रमात अभिनेत्यानं भजन देखील गायलं, याशिवाय त्यानं त्याच्या चाहत्यांना हस्तांदोलन देखील यावेळी केला. आता गोंविदा हा चित्रपटसृष्टीम ध्ये सक्रिय होणार असं या व्हिडिओवरून दिसत आहे.

गोविंदा वैयक्तिक आयुष्यासाठी चर्चेत होता : यापूर्वी गोविंदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळं खूप चर्चेत आला होता. काही दिवसांपूर्वी गोविंदा आणि त्याची पत्नी सुन- ीता आहुजा यांच्यामध्ये खूप मतभेद झाल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. यानंतर सुनीताने स्वत: या वृत्तांचे खंडन केले होते. याशिवाय गोविंदाचे एका अभिनेत्रीबरोबर अफेअर असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. या बातमीचे देखील सुनीता आहुजानं खंडन करत म्हटले की, ''गोविंदाचे कोणत्याही अभिनेत्रीबरोबर अफेअर

## सनी लिओनीचा मथुरेतील बारमध्ये डीजे इव्हेंट प्रचंड विरोधानंतर रद्द

मुंबई- आगामी वर्षाच्या स्व- ागताची सध्या सर्वत्र जोरदार तयारी केली जात आहे. यादरम्यान उत्तर प्रदेशच्या मथुरा येथील एका बारमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अभिनेत्री सनी लिओनीच्या कार्यक्रमावरून वाद पेटला आहे. शहरातील पुजाऱ्यांनी या कार्यक्रम

ाला विरोध दर्शवल्यानंतर हा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. बारकडून जारी करण्यात आलेल्या प्रमोशनल व्हिडीओमध्ये सांगण्यात आले होते की, सनी लिओनीने ती १ जानेवारी रोजी डीजे (डिस्क जॉकी) म्हणून नवीन वर्ष ''किक स्टार्ट'' करण्यासाठी येथे येणार आहे. मात्र हा व्हिडीओ समोर आल्यानंतर काय कार्यक्रमाला

प्रचंड विरोधाचा सामना करावा लागली ''मी डीजे म्हणून एका अविस्मरणीय रात्रीसह नवीन वर्षाची जबरदस्त सुरूवात करण्यासाठी १ जानेवारी रोजी मथुरा येथे येत आहे, हे सांगताना मला खूप आनंद होत आहे,'' असे लिओनी व्हिडीओमध्ये म्हणाली होती. ''सर्वात मोठ्या बॉलीवूड सेन्सेशन''चा कार्यक्रम असे या आयोजनाचे वर्णन करण्यात आले होते. मात्र, पुजाऱ्यांनी मथुरा ही एक 'देव भूमी' असल्याचे सांगत हा कार्यक्रम रद्द करण्याची म ागणी केली. त्यांनी सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात एका पुर्जायांनी म्हटले आहे

की, लिओनी ही एक माजी 'अडल्ट स्टार' आहे आणि या कार्यक्रमात अीलता दाखवण्याची तयारी सुरू आहे. संपूर्ण जगभरातून भाविक मथुरा येथे पूजा-अर्चना करण्यासाठी येतात. काही लोकांकडून या पवित्र भूमीला बदनाम करण्याचा कट रचला जात आहे. असे कार्यक्रम आयोजित करून धार्मिक भावना भडकवण्याची त्यांची योजना आहे. हे लोक धार्मिक शहराला बदनाम करू इच्छित आहेत, असे या पत्रात म्हटले आहे.
दरम्यान या कार्यक्रमाला जोरदार विरोध होत

असल्यामुळे बारने हा कार्यक्रम रद्द केला आहे. आदरणीय आणि पूजनीय ऋषी-मुनींचा सन्मान राखत, आम्ही १ जानेवारीचा सनी लिओनीचा कार्यक्रम रद्द करत आहोत, असे त्या बारकडून सांगण्यात आले आहे.



## इक्कीसच्या प्रीमियरला रेखा यांनी अमिताभ बच्चन यांच्या नातवाचे पोस्टर पाहिले अन् फ्लाईंग किस दिला

मुंबई-अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा आणि अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया हे या चित्रपटात प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. विशेष म्हणजे दिवंगत अभिनेते धर्मेंद्रही या सिनेमात झळकणार असून, हा त्यांचा शेवटचा चित्रपट असल्याचं सांगितलं जात आहे. या चित्रपटाचा प्रीमियर सोमवारी पार पडला.या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री रेखाही खास उपस्थित होत्या. या प्रेमियर दरम्यान रेखा यांनी अमिताभ बच्चन यांच्या नातवाचे पोस्टर पाहिले अन् फ्लाईंग किस दिला,हे बघून नेटकऱ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. याचे व्हिडओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत.

अमिताभ बच्चनच्या नातवावर रेखाचा प्रेमवर्षाव
या प्रीमियरला सलमान खान, बॉबी देओल, सनी देओल यांसारखे अनेक बॉलिवूड स्टार्स उपस्थित होते. सर्वांनी धर्मेंद्र यांच्या पोस्टरजवळ उभं राहून फोटो काढले आणि भावूक होताना दिसले. रेखाने ग्रेसफुल अंदाजात एन्ट्री केली. सर्वप्रथम त्यांनी धर्मेंद्र यांच्या पोस्टरसमोर हात जोडून नमस्कार केला. नंतर रेखा पुढे सरकल्या आणि चित्रपटाचा लीड हिरो, अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा यांच्या फोटोला फ्लाईंग किस दिलं. रेखाचा हा क्षण कॅमेऱ्यात कैद झाला असून, सध्या तो व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. अगस्त्य नंदाच्या पोस्टरवर प्रेमाचा वर्षाव करतानाचे रेखाचे व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आ- हेत. या कार्यक्रमात रेखा हिरव्या रंगाच्या साडीत अतिशय देखण्या दिसत होत्या. एकेकाळी अमिताभ बच्चन आणि रेखा यांच्या अफेअरच्या चर्चा चांगल्याच रंगल्या होत्या. रेखाजींनी अगस्त्यला दिलेल्या प्रेमळ शुभेच्छा चर्चेचा विषय ठरत आहेत.



मइक्कीसफ कधी होणार प्रदर्शित?
मइक्कीसफ या चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर, आधी हा सिनेमा डिसेंबर २०२५ मध्ये प्रदर्शित होणार होता. मात्र नंतर तो पुढे ढकलण्यात आला. आता हा चित्रपट १ जानेवारी २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाचे दिग्दर्शन श्रीराम राघवन यांनी केले असून, निर्मिती दिनेश विजान यांची आहे.
या चित्रपटातून अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. तर अगस्त्य नंदाची ही पहिलीच थिएटर रिलीज होणारी फिल्म आहे. याआधी तो नेटफ्लिक्सवरील मद आर्चीजफमध्ये दिसला होता. त्या चित्रपटात सुहाना खान आणि खुशी कपूर यांचेही पदार्पण झाले होते. मद आर्चीजफचे दिग्दर्शन जोया अख्तर यांनी केले होते.

## मीराने पती शाहिद कपूर आणि तिच्या दोन गोंडस मुलांचा फोटो केला शेअर...

म ुंबई,-बॉलिवूड स्टार शाहिद कपूरची पत्नी उद्योजिका मीरा राजपूतनं तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तिचा पती, अभिनेता शाहिद कपूर, आणि त्यांची दोन



गोंडस मुले, मिशा आणि झैन एकत्र दिसत आ- हेत. या फोटोमध्ये शाहिद नदीच्या काठावर उभे राहून आपल्या दोन्ही मुलांना सुंदर निसर्गरम्य दृश्य दाखवण्यात मग्न असल्याचे दिसत आहे. मिशा आणि झैन दोघेही आपल्या वडिलांकडे काळजीपूर्वक पाहत असून त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत आहेत. आता मीरानं शेअर केलेला हा फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे. म ीरा ही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे, ती अनेकदा आपल्या कुटुंबाबरोबरची फोटो सोशल मीडियावर शेअर करत असते.

मीरा राजपूतनं शेअर केला फोटो : दरम्यान मीरा आणि शाहिद यांना त्यांची मोठी मुलगी मिशा ही ऑगस्ट २०१६मध्ये झाली होती. यानंतर त्यांचा मुलगा झैन सप्टेंबर २०१८मध्ये झाला होता. दरम्यान या जोडप्याच्या नात्याबद्दल सांगायचं झालं तर शाहिद आणि मीरा यांचं लग्न हे ७ जुलै २०१५ रोजी गुरुग्राममध्ये खूप भव्य पद्धतीनं झालं होतं. त्यांचा हा विवाह कौटुंबिक होता, यामध्ये जवळचे मित्रमंडळी देखील उपस्थित होते. शाहिद हा त्याच्या लग्नानंतर खूप चर्चेत होता. दरम्यान याशिवाय काही दिवसापूर्वी मीरानं आपल्या जुन्या आठवणींचा उजाळा देत मुलगी मिशा आणि तिच्या आजीच्या घरी केलेल्या पहिल्या सहलीची आठवण सांगितली होती. तसेच मिशा आणि झैन हे आपल्या वडिलांबरोबर मस्ती करताना दिसतात.
मिशानं लावला होता बेकिंग स्टॉल : याशिवाय अनेकदा शाहिद देखील आपल्या मुलांबरोबरचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत असतो. दरम्यान नोव्हेंबरमध्ये मीरानं इंस्टाग्राम अकाउंटवर तिच्या ८ वर्षाच्या मुलीनं म्हणजेच मिशानं स्वत:चा बेकिंग स्टॉल लावला होता, याबद्दल सांगितलं होतं. याशिवाय मिशाचे काही तासाच कुकीज आणि मफिन्स विकले गेले, हेही तिनं अभिमानानं सांगून तिचे कौतुक केले हो- ते. तिनं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, मआज माझ्या मुलीचा खूप अभिमान वाटतो! मिश मॅश बेकरी कुटुंबातील सर्वात तरुण संस्थापक. म या पोस्टमध्ये मीरानं ओट्स अँड रेझिन्स आणि डीप डिश चोको चिप यांसारख्या चविष्ट कुकीजच्या चित्रांची झलक देखील शेअर केली होती. या चविष्ट कुकीजची किंमत प्रत्येकी २०० रुपये होती. दरम्यान शाहिदच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर तो पुढं ओरोमियो आणिकॉकटेल २फ या

## 'मुन्नाभाई ३' बानू शकला नाही ते सुद्धा शाहरुखमुळे?

बॉलिवूडमध्ये अशी काही जोडी आहे जिने चाहत्यांच्या हृदयावर अमिट ठसा सोडला 'मुन्ना भाई' आणि 'सर्किट'. राजकुमार हिराणींच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या 'मुन्नाभाई चइइड' आणि 'लगे रहो मुन्नाभाई'ने फक्त संजय दत्तच्या करिअरला नवसंजीवनी दिली नाही, तर अर्शद वारसीलाही घरा- घरात पोहोचवले.पण चाहते गेल्या अनेक वर्षांपासून एका प्रश्नाच्या शोधात आहेत 'मुन्नाभाई ३' कधी येणार?
मुन्नाभाई चले अमेरिका' टीझर आला, चित्रपट नाही
'मुन्नाभाई' सिरिजचा तिसरा भाग 'मुन्नाभाई चले अमेरिका' म्हणून येणार असल्याची घोषणा झाली होती. टीझर प्रदर्शितही झाला, पण चित्रपट कधीच प्रेक्षकांच्या भेटीला आला नाही. या रेंगाळण्यामागची खरी कारणे अर्शद वारसीने 'लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत उघड केली.त्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रोजेक्टच्या थांबण्यामागे थेट बॉलिवूडचा 'किंग' शाहरुख खान होता. 'मुन्नाभाई चले अमेरिका'ची कथा शाहरुख खानच्या 'माय नेम इज खान'शी खूपशी मिळती होती. त्या चित्रपटातही मुन्ना आणि सर्किट अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना भेटण्यासाठी जात असत. राजकुमार हिराणींना त्यांच्या चित्रपटात दुसऱ्या कुणाच्या चित्रपटासारखी समांतरता आवडत नाही. त्यामुळे त्यांनी हा प्रोजेक्ट थांबवण्याचा निर्णय घेतला,' असे अर्शदने स्पष्ट केले.

राजकुमार हिराणींचा ओरिजनॅलिटीसाठी अढळ स्वभाव राजकुमार हिराणी हे त्यांच्या ओरिजनॅलिटी आणि परिपूर्णतेसाठी ओळ- खले जातात. अर्शदने सांगितले की, हिराणी इतके शिस्तप्रिय आहेत की जेव्हा त्यांना 'ओह माय गॉड'बाबत कळले, तेव्हा त्यांनी 'पीके'च्या सेकंड हाफला तीन वेळा पुन्हा लिहिले. सध्या हिराणींकडे 'मुन्नाभाई ३'साठी तीन वेगवेगळ्या स्क्रिप्ट्स तयार आहेत, ज्या इतर अनेक चित्रपटांपेक्षा उत्तम आहेत, पण ते अद्याप परिपूर्णतेच्या शोधात आहेत. अर्शदच्या म्हणण्यानुसार, हे चित्रपट प्रेक्षकांना आणि स्वत: हिराणींच्या मापदंडानुसार पूर्णपणे संतुष्ट करणारे असावे, म्हणूनच प्रोजेक्ट अजूनही थांबलेले आहे. अर्शदने एक मजेशीर किस्साही शेअर केला. सुरुवातीला त्याला 'मुन्नाभाई चइइड'मध्ये काम करायची इच्छा नव्हती. पण एका टॅरो कार्ड रीडरच्या सल्ल्यानुसार, त्यांनी विधू विनोद चोप्रांशी भेट घेतली आणि तिथेच राजकुमार हिराणींची भेट झाली. सुरुवातीला त्याच्या पात्राचे नाव 'खुजली' होते, पण अर्शदने ते बदलून 'सर्किट' केले. त्यांनी सेटवर संवादांमध्ये अनेक सुधारणा (खार्ीींळीरींळेप) केल्या, पण हिराणींनी कधीही विरोध केला नाही. अर्शदच्या अभिनयातील स्वातंत्र्य आणि हिराणींच्या आदरयुक्त मार्गदर्शनामुळे 'सर्किट' पात्र अजरामर ठरले.

# सलमानची भूमिका असलेल्या बॅटल ऑफ गलवान चित्रपटावर चीनचा थयथयाट!

### हा चित्रपट २०२० मध्ये भारतीय लष्कराच्या म१६ बिहार रेजिमेंटचे जवान आणि चिनी सैनिकांमध्ये गालवान खोऱ्यात झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर बनवण्यात आला



मुंबई-बॉलीवूड अभिनेता सलमान खान स्टारर चित्रपट 'बॅटल ऑफ गलवान' यामध्ये तथ्यांची मोडतोड करून दाखवण्याच आल्याचा दावा चिनी माध्यमांमधून करण्यात येत आहे. यावर भार- ताने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. देशात 'आर्टिस्टिक फ्रीडम' आहे आणि चित्रपट निर्माते या स्वातंर्त्याचा वापर करून चित्रपट बनवतात असी भूमिका मंगळवारी सरकारी सूत्रांनी स्पष्ट केली आहे. एनडीटीव्हीने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.'बॅटल ऑफ गलवान' हा चित्रपट २०२० मध्ये भारतीय लष्कराच्या '१६ बिहार रेजिमेंट'चे जवान आणि चिनी सैनिकांमध्ये गालवान खोऱ्यात झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर बनवण्यात आला आहे. हा चित्रपट शिव अरूर आणि राहुल सिंग यांनी लिहिलेल्या 'इंडियाज मोस्ट फिअरलेस ३' या पुस्तकातील एका सत्य कथेवर आधारित आहे.

या चित्रपटात सलमान खान हा १६ बिहार रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बिक्कूमल्ला संतोष बाबू यांच्या भूमिकेत आहे. गलवान खोऱ्यात पीपल्स लिबरेशन आर्मी (इथ्अ) च्या सैनिकांशी झालेल्या संघर्षात त्यांचा मृत्यू झाला होता.
केंद्र सरकारने येथे झालेल्या क्रूर लढाईमध्ये २० जवांनाना वीरमरण आल्याची अधिकृत कबुली दिली होती. तर दुसरीकडे चीनने सुरूवातीला येथे कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे म्हटले हो- ते, मात्र नंतर आपल्या फक्त चार जवानांचा मृत्यू झाल्याचे कबूल केले होते. चीनने हा आकडा खूप कमी करून सांगितल्याचे बोलले जाते.
''भारत हा अभिव्यक्ती स्वातंर्त्य असलेला देश असून सिनेमॅटिक एक्स्प्रेशन हा त्याचा अविभाज्य भाग आहे. भारतीय चित्रपटनिर्माते हे या आर्टिस्टिक फ्रीडमनुसार चित्रपट बनवण्यास स्वतंत्र आहेत,'' असे सूत्रांने एनडीटीव्हीशी बोलताना सांगितले.
''ज्यांना या विशिष्ट चित्रपटाबाबत काही आक्षेप असतील, ते स्पष्टीकरणासाठी भारताच्या संरक्षण मंत्रालयाशी संपर्क साधण्यास स्वतंत्र आहेत. या चित्रपटाच्या निर्मितीमध्ये सरकारची कोणतीही भूमिका नाही,'' असेही या सूत्रांनी पुढे नमूद केले.
गलवान येथे झालेल्या संघर्षानंतर भारत आणि चीन यांच्यातील तणाव चांगलाच वाढला होता, त्यानंतर लडाख येथे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर सैन्य तैनाती वाढवण्यात आली होती.
चीनचे सरकारी वृत्तपत्र 'ग्लोबल टाइम्स'मधील एका लेखात या चित्रपटावर आक्षेप घेण्यात आले आहेत. चित्रपटामध्ये जून २०२० मध्ये झालेला संघर्ष ज्या पद्धतीने दाखवण्यात आला आहे, तो वस्तुस्थितीला धरून नाही , असा दावा या लेखातून करण्यात आला आहे.''बॉलीवूडचे चित्रपट जास्तीत जास्त मनोरंजनावर आधारित, भावनेने भरलेले चित्रण दाखवू शकतात, मात्र कितीही सिनेमॅटिक अतिशयोक्ती केली तरी इतिहास बदलू शकत नाही किंवा चीनच्या सर्वभौम भूभागाचे रक्षण करण्याचा पीएलएच्या निर्धाराला धक्का देऊ शकत नाही,'' असे लेखात म्हटले आहे.ग्लोबल टाइम्समध्ये गल- वान खोरे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या पलीकडे चिनी बाजूला असल्याचा खोटा दावा केला आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात मतदान जनजागृती शपथ



**लातूर/प्रतिनिधी :** शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ स्वीप अंतर्गत मतदान जनजागृतीनिमित्त दयानंद विज्ञान महाविद्यालयामध्ये विद्यार्थी,शिक्षक व पालक यांनी मतदान जनजागृतीची शपथ घेतली. यावेळी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, डॉ.एस.पी.कोल्हे, डॉ.के.एस.गोमारे आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

निवडणूक विभागाच्या या स्वीप उपक्रमाला दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.यावेळी शंभर टक्के मतदानासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा,जनजागृती करावी आणि लोकशाही बळकटीकरणासाठी प्रत्येक नागरिकांचे मत अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येकांनी एक जागरूक नागरीक म्हणून मतदानाचा हक्क बजावून इतरांनाही मतदानासाठी प्रवृत्त करावे,असे आवाहन करण्यात आले.या उपक्रमामुळे लोकशाहीच्या उत्सवात महाविद्यालयीन युवकांमध्ये निश्चितच उत्सूकता निर्माण झाली आहे.

## पुणे सैनिक कल्याण विभागात लिपीक टंकलेखक (गट-क) पदाची भरती

**लातूर/प्रतिनिधी :** सैनिक कल्याण विभागातील लिपीक टंकलेखक (गट-क) सरळसेवा पदभरती जाहिरात ४ नोव्हेंबर, २०२५ व शुध्दीपत्रक १२ डिसेंबर, २०२५ विभागाच्या संकेतस्थळावर रोजी प्रसिध्द झाली आहे. अर्जदारांना ऑनलाईन अर्ज भरतीसाठी वेबलिंक देण्यात आली आहे. परंतु, सैनिक कल्याण विभागाचे संकेतस्थळ तांत्रिक कारणाने २६ डिसेंबर, २०२५ पासून निष्क्रिय झाल्याने इच्छुक उमेदवार वेबलिंकपर्यंत पोहचू शकत नाहीत. त्यामुळे ऑनलाईन अर्ज भरण्यास ९ जानेवारी, २०२६ संध्याकाळी २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32786/96173/Index.html या वेबलिंकचा वापर करुन ऑनलाईन अर्ज भरावेत, असे लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

## दौंड-काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरीकरण कार्यान्वितीकरणामुळे सोलापूर विभागातील स्थानकांमधून धावणाऱ्या गाड्यांवर होणारे परिणाम

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वे, दौंड-मनमाड विभागातील दौंड-काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरी मार्गाच्या कार्यान्वितिकरणासाठी वाहतूक ब्लॉक घेणार आहे. या ब्लॉकमुळे सोलापूर विभागातील स्थानकांमधून धावणाऱ्या गाड्यांवर होणारे परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

रद्द केलेल्या गाड्या
खालील गाड्या रद्द राहतील:

- गाडी क्रमांक ०१४६१ सोलापूर-दौंड डेमू स्पेशल, दि. ०४.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ पर्यंत
- गाडी क्रमांक ०१४६२ दौंड-सोलापूर डेमू स्पेशल, दि. ०४.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ पर्यंत
- गाडी क्रमांक ०१४२२ कलबुरगि-दौंड स्पेशल, दि. २४.०१.२०२६ रोजी
- गाडी क्रमांक ०१४२५ दौंड-कलबुरगि स्पेशल, दि. २५.०१.२०२६ रोजी
- गाडी क्रमांक ११४१३ निजामाबाद-पंढरपूर एक्सप्रेस, दि. २५.०१.२०२६ रोजी
- गाडी क्रमांक ११४१४ पंढरपूर-निजामाबाद एक्सप्रेस, दि. २६.०१.२०२६ रोजी

पुनर्नियोजित (रिशेड्युल) खालील गाड्या नमूद केल्याप्रमाणे पुनर्नियोजित केल्या जातील:

- गाडी क्रमांक २२६०२ साईनगर शिर्डी-चेन्नई सेंट्रल साप्ताहिक एक्सप्रेस, दि. १६.०१.२०२६ रोजी २ तासांनी पुनर्नियोजित केली जाईल.
- गाडी क्रमांक ११३०१ सीएसएमटी मुंबई-केएसआर बंगळूरू उद्यान एक्सप्रेस, दि. २४.०१.२०२६ रोजी १ तासाने पुनर्नियोजित केली जाईल.
- गाडी क्रमांक १८५२० एलटीटी मुंबई-विशाखापट्टणम एक्सप्रेस, दि. २५.०१.२०२६ रोजी ४ तास ३० मिनिटांनी पुनर्नियोजित केली जाईल.

प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी या परिणामांची नोंद घ्यावी आणि त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे.

**लातूर येथे राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ ला प्रारंभ**

# अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### - अपघाती मृत्यू टाळण्यासाठी युवा वर्गाने पुढाकार घेण्याची गरज
### - अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींच्या मदतीसाठी संवेदनशीलता दाखवा

**लातूर/प्रतिनिधी :** प्रत्येक व्यक्तीचा जीव मौल्यवान असतो, मात्र वाहतूक नियमांचे पालन न केल्याने आपण आपला आणि इतरांचाही जीव धोक्यात टाकतो. देशात जवळपास एक ते दीड लाख व्यक्तींचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो, यामध्ये सुमारे दहा ते अकरा टक्के मृत्यू आपल्या राज्यात होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे. विशेषतः युवा वर्गाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा, युवक-युवतींनी वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.



लातूर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रस्ते सुरक्षा विषयक माहितीपुस्तिका, भिंतीपत्रिका, जनजागृती फलकाचे प्रकाशन करण्यात आले.

नववर्षाच्या पहिल्याच दिवसापासून राज्य रस्ता सुरक्षा अभियान सुरू होत आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने नववर्षानिमित्त वाहतूक नियमांच्या पालनाचा संकल्प करावा. आपला जीव हा सर्वात मौल्यवान आहे, वेगात वाहन चालवून आपला जीव धोक्यात घालू नका. केवळ दंड वाचविण्यासाठी नव्हे, तर स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचविण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करावे. वाहने सावकाश चालवा. रस्ता सुरक्षा ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तसेच अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना मदत करण्याची संवेदनशीलता आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. रस्ता सुरक्षा का आवश्यक आहे, याची जाणीव प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. अपघातामध्ये मृत्यू होणे दुर्दैवी बाब असून, मृत्यूमुळे होणारी हानी भरून न निघणारी आहे. अपघात रोखण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करावे. दुचाकी चालवताना हेल्मेट आणि चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करणे आवश्यक आहे. अपघातात होणारे बहुतांशी मृत्यू हे हेल्मेट, सीट बेल्ट न वापरल्यामुळे होतात, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

रस्ता सुरक्षा अभियान हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे, रस्ते अपघातातील मृत्युदर हा एखाद्या महामारीमुळे होणाऱ्या मृत्यूपेक्षा अधिक आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वांनी वाहतुक नियमांचे पालन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी केले. तसेच पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहने चालविण्यास देवू नयेत. त्यामुळे अपघात झाल्यास त्याची जबाबदारी पालकांवर येते, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे यांनी केले. यावेळी त्यांनी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अपघातग्रस्तांना मदत करणारे दयाराम जगन्नाथ सुडे, गणेश गिराम, आबासाहेब शिंदे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

**नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर आता 'रडार'ची नजर**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना ई-चलनद्वारे दंड आकारण्याची कार्यवाही वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागामार्फत केली जात होती. मात्र, आता परिवहन विभागाच्या ताफ्यात आता २ नवीन 'रडार' वाहने दाखल झाली आहेत. यामुळे महामार्गांवर, रहदारीच्या ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कॅमेरा, सेन्सरद्वारे लक्ष ठेवता येणार आहे. तत्याने अपघात होत असलेल्या ठिकाणी पहिल्या टप्प्यात हे वाहन तैनात केले जाणार आहे. तसेच वाहतूक कोंडी निर्माण होणाऱ्या ठिकाणी ही वाहने तैनात केली जातील. वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनावर ई-चलनद्वारे दंड आकारण्याची कार्यवाही या वाहनाद्वारे केली जाणार आहे. या वाहनांना आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

## सामाजिक कार्यकर्ते वासुदेव वेदपाठक यांना समाज भुषण पुरस्कार प्रदान

**सोलापूर/प्रतिनिधी :** रा. प. महामंडळातील सेवा निवृत्त कर्मचारी व धाराशिव येथील सामाजिक कार्यकर्ते वासुदेव वेदपाठक यांना सोनार समाज सेवा संस्था सोलापूर यांचे कडुन राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार प्रदान करून सपत्नीक सन्मानित करण्यात आले.

मा. श्री. भारत कारीकर मा. अध्यक्ष श्री. संत नरहरी महाराज मंदिर समिती पंढरपूर यांचे शुभ हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोनार समाजातील कर्त त्ववान व्यक्तींना यावेळी समाज भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वासुदेव वेदपाठक हे सामाजिक कार्यात अग्रेसर असुन, सचिव राज्य गुणवंत कामगार अशोशिएशन जिल्हा धाराशिव, संचालक समता सहकारी गृह निर्माण संस्था धाराशिव, सचिव जेष्ठ नागरिक महासंघ ता. धाराशिव, सदस्य पंतप्रधान आयुष्यमान आरोग्य योजना,महात्मा फुले जन आरोग्य योजना. आदी ठिकाणी कार्यरत आहेत.

गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार, कामगार रत्न, परिवहन सेवा पुरस्कार, युवा पुरस्कार, कामगार भुषण, श्रम गौरव पुरस्कार आदी राज्यस्तरीय व विभागीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

व्यासपिठावर नरहरी महाराज मंदिर समिती पंढरपूरचे कार्य वाहक संजय आष्टीकर, खजिनदार संजय पंडित, उपाध्य क्ष मोहन मंद्रूपकर, संस्थेचे वसंत पोतदार, दत्तगुरु वेदपाठक, मोहन मंद्रूपकर, उपस्तिथ होते. संस्थेच्या पदाधिकारी यांनी सन्मान सोहळा व शासकीय योजना शिबीर अत्यंत चांगल्या रीतीने पार पाडले.

श्री. महादेव महाराज आडसूळ अद्यक्ष जेष्ठ नागरिक संघ जिल्हा धाराशिव, अच्युत माने पाटील सचिव जेष्ठ नागरिक संघ, राजाभाऊ आंधळे कार्याध्यक्ष, माधवसिंग राजपूत, नबी शेख, शाहुराज कावरे, रामभाऊ कवडे, सोमेश्वर पाळणे, बाबा साहेब गरड यांनी अभिनंदन केले.

विविध सामाजिक संस्था व मान्यवराकडून वेदपाठक यांचे अभिनंदन होत आहे.

## सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांनी मासिक विवरणपत्र ३१ जानेवारीपूर्वी ऑनलाईन सादर करणे बंधनकारक

**लातूर/प्रतिनिधी :** सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार बंधनकारक असल्याने विवरणपत्र तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालयाचे https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नियोक्त्यांच्या लॉगइन मध्ये ईआर-१ सादर करताना पोर्टलवर एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉगइन मध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉगईन करुन डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लीक करावे, त्यानंतर एंटर ईआर-१ वर क्लीक करुन तिमाही विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करता येईल. याचा वापर करुन ३१ जानेवारी, २०२६ अगोदर ईआर-१ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. हे विवरणपत्र सादर करताना काही तांत्रिक अडचण आल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# विश्वेश्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंग अँड टेकनॉलॉजी, आलमला यांना सलग तिसयांदा एनबीए मानांकन

### महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भक्कम पावती

**लातूर/प्रतिनिधी :** आलमला (ता. औसा, जि. लातूर): ग्रामीण भागात अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षेत्रात दर्जा, गुणवत्ता आणि शैक्षणिक शिस्त यांचे आदर्श उदाहरण ठरलेल्या श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आलमला या महाविद्यालयाला नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रेडिटेशन (एनबीए), नवी दिल्ली यांच्याकडून सलग तिसयांदा मानांकन (अ‍ॅक्रेडिटेशन) प्राप्त झाले आहे. ही कामगिरी केवळ संस्थेसाठीच नव्हे तर संपूर्ण लातूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी व्यक्त केले.

या मानांकनासाठी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनीयरिंग, सिव्हिल इंजिनीयरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीयरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंग आणि मेकॅनिकल इंजिनीयरिंग या पाच प्रमुख शाखांकरीता एनबीए मानांकनाची मागणी करण्यात आली होती व या पाचही शाखांना मानांकन प्राप्त झाले आहे. या सर्व शाखांना सलग तिसयांदा एनबीए मानांकन मिळाल्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक दर्जावर पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर भक्कम शिक्कामोर्तब झाल्याचे मत संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी व्यक्त केले.

एनबीए मानांकन ही प्रक्रिया अत्यंत कठोर व बहुआयामी निकषांवर आधारित असते. अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती, शिक्षकांची शैक्षणिक व संशोधन पात्रता, प्रयोगशाळा, अत्याधुनिक ग्रंथालय व पायाभूत सुविधा, उद्योगांशी असलेली सांगड, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, निकालांची गुणवत्ता, प्लेसमेंट तसेच संस्थेचे दीर्घकालीन शैक्षणिक धोरण या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून मानांकन दिले जाते. या सर्व निकषांवर महाविद्यालयाने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे हे मानांकन



मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

सदरील यशाबद्दल श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला चे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, संचालक जयशंकर हुरदळे, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी आलमला चे चेअरमन विश्वनाथ बिराजदार, योगेश धाराशिवे, अमरसिंग हजारी व सर्व संचालक मंडळ यानी समाधान व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित असून, विशेषतः गुणवत्तापूर्ण अध्यापन, कौशल्याधारित शिक्षण, संशोधनास प्रोत्साहन, तसेच विद्यार्थिना उद्योगाभिमुख बनवण्यावर महाविद्यालयाचा भर असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे यांनी सांगितले.

महाविद्यालय भविष्यातही नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संशोधन व स्टार्टअप संस्कृतीला चालना देत विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम करण्याचा संकल्प करत असल्याचे संस्थेच्या वतीने सचिव बसवराज धाराशिवे यांनी स्पष्ट केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या स्वाती कापसे, विश्वेश्वरय्या इन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य किशोर जेवे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयात इफेक्टिव्ह म्यानुस्क्रिप्ट लेखनावर सेमिनार

**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील फार्माकोलॉजी विभागाच्या वतीने हाऊ टू राईट अ इफेक्टिव्ह म्यानुस्क्रिप्टया विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारसाठी डॉ. सुमित जोशी, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, ओतूर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी संशोधन लेखनातील मूलभूत बाबी, योग्य जर्नलची निवड, संशोधन लेखाची रचना (प्रस्तावना, कार्यपद्धती, निकाल, चर्चा), संदर्भ लेखन, प्लॅजिअरिझम टाळण्याचे उपाय तसेच प्रकाशन प्रक्रियेतील महत्त्वाच्या टप्प्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात संशोधन लेखन करताना होणाऱ्या सामान्य चुका, त्या टाळण्यासाठीच्या उपाययोजना आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे हस्तलिखित तयार करण्यासाठी आवश्यक कौशल्ये यावर विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना डॉ. जोशी यांनी सखोल व समर्पक उत्तरे दिली.

या सेमिनाराचे यशस्वी आयोजन कार्यक्रम समन्वयक डॉ. पद्मजा गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात



आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सबा शेख तर आभार प्रदर्शन डॉ. राम साखरे यांनी केले. सदरील सेमिनारसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# महाराष्ट्र महाविद्यालयात कॅम्पस फिल्म सोसायटीचे उद्‌घाटन

## विद्यार्थ्यांनी समाजाप्रती संवेदनशील असले पाहिजे: अनिल कांबळे

**निलंगा/आयुब बागवान :** आपल्या सभोवती असलेल्या समाजाचे प्रश्न समजून घेऊन त्यांची उकल करण्यासाठी कष्ट घ्यायला हवेत. आपल्या कडे असलेल्या कला आणि कौशल्याचा वापर समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी करायला हवा असे मत लातूर येथील प्रसिद्ध सिने अभिनेते आणि नाट्य दिग्दर्शक श्री. अनिल कांबळे यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र महाविद्यालयात मागील १३ वर्षांपासून सुरू असलेल्या कॅम्पस फिल्म सोसायटीच्या या वर्षातील उपक्रमांचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम होते तर मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एस. गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. हंसराज भोसले यांची उपस्थिती होती.



आपल्या उद्घाटकीय मनोगतात पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयीन जीवनात जे अनुभव आले आणि जी संस्कारांची शिदोरी मिळाली त्याची आठवण विद्यार्थ्यांना सांगून आपल्या अडचणींवर मात करण्याची सर्वांनी जिद्द बाळगली पाहिजे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी सुलतान या लघुपटाचा विशेष शो विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. अण्णाभाऊ साठे यांच्या लघुकथेवर आधारित असलेल्या या लघुपटातून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची ओळख जगाला झाली असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

आपल्या मनोगतात याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी चित्रपट पाहताना त्यातील समाज दर्शन, प्रश्नांची मांडणी काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे. त्यातून योग्य तो संदेश घ्यायला पाहिजे असे मत व्यक्त केले. शिवाय, विद्यार्थ्यांनी चित्रपट नीट समजून नाही घेतला तर त्याचे वाईट परिणाम होऊ शकतात हे ही नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ कर्मवीर कदम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात चित्रपट समाजात एक कथानक उभे करत असतो. त्याची समाजात विचार रुजविण्याची ताकद मोठी आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांनी चित्रपटाकडे निव्वळ मनोरंजन म्हणून न पाहता, त्याचा बारकाईने अभ्यास करावा शिवाय, एक सुसंस्कृत माणूस बनवण्यात चित्रपट मोठी भूमिका बजावू शकतो. समकालीन वातावरणात विद्यार्थ्यांनी आशयसंपन्न चित्रपट पहावेत आणि त्यातून समाजाचे प्रश्न समजून घ्यायला हवेत असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय कॅम्पस फिल्म सोसायटीचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी करून दिला तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. हंसराज भोसले यांनी केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु.मुळे अंकिता व आगलावे अंकिता यांनी पार पाडली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. गोपाळ मोघे, प्रा. मनिषा घोगरे, प्रा. पूनम सातपुते, श्री. सुनील वाकळे, श्री. सिद्धेश्वर कुंभार, श्री. सचिन महिंद्रकर, श्री. राजू एखंडे यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी अनेक प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# एमआयडीसीतील बांधकाम अट शिथील करण्याची व्यापारी संघाची मागणी

## उद्योग राज्यमंत्र्याचा सकारात्मक प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यभर सर्वच एमआडीसीमध्ये एक एकर किंवा त्यापेक्षा कमी जागा असलेल्या भूखंड धारकांना ४० टक्के बांधकामाची अट टाकण्यात आली असून ही अट जाचक असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार अ‍ॅड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून याचा राज्यातील सर्वच छोट्या व्यावसाईकांना लाभ होणार आहे.

सरकारने लोकल फॉर व्होकल ही योजना अस्तित्वात आणल्यानंतर व स्वदेशी व्यावसायीकांना प्राधान्य दिल्यानंतर एमआयडीसीतील छोट्या व्यापार्यांना ज्यांच्याकडे एक एकरपेक्षा कमी भूखंड आहे अशांना ४० टक्के बांधकाम बंधनकारक केले आहे. छोटे व्यापारी असल्यामुळे कमी भांडवलात व्यवसाय सुरू करताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम करणे व्यापार्यांना अडचणीचे होत असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार संतोष गिल्डा यांनी लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने राज्यातील छोट्या व्यावसायीकांना त्याचा लाभ होणार आहे.

राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे लातूर येथे एका खाजगी कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी त्यांना लातूरसह राज्यातील व्यवसायीकांच्या अडी-अडचणीबाबतची चर्चा मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार अ‍ॅड. संतोष गिल्डा यांच्यासह अन्य व्यावसायीकांसोबत झाली.

यावेळी छोट्या व्यावसायीकांना येत असलेल्या अडचणींबाबत व व्यवसाय वाढी संदर्भात सकारात्मक चर्चा झाल्यानंतर तसेच



केंद्र व राज्याचे धोरण स्वदेशी व्यावसायीकांना प्रोत्साहन देणारे असल्याने छोटे-मोठे व्यावसायीक आपआपल्या एमआयडीसीमध्ये नवनवीन प्रयोग तयार करत आहेत. त्यातून रोजगार उपलब्ध होत असल्याने बेरोजगारी दूर होण्यास मदत होते आहे.

व्यवसायाला लागणारे भांडवल व मशनरीचा खर्च हे कर्ज रूपाने घेतल्यानंतर व्यावसायीक हा आर्थिक अडचणीतून आपला व्यवसाय करत असताना त्याला एमआयडीसीत ४० टक्के बांधकाम करण्याची अट टाकल्याने व्यवसायातील भांडवल कमी होते शिवाय अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही गोष्ट मराठवाडा व्यापारी संघाच सल्लागार अ‍ॅड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनीही या संदर्भात आपण योग्य तो पर्याय उपलब्ध करून असे आश्वासन दिल्याने लातूरसह महाराष्ट्रातील एमआयडीसीतील छोट्या व्यावसायीकांना याचा फायदा होणार आहे.

## जानेवारी महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

**लातूर/प्रतिनिधी :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु, सद्यस्थितीत लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजवणी सुरु असल्यामुळे ०५ जानेवारी २०२६ रोजी लोकशाही दिन स्थगित करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ५ जानेवारी, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १९ जानेवारी, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# दयानंद विज्ञानमध्ये आयटी कंपनीत नोकरीसाठी तयारी कशी करावी या विषयावर व्याख्यान



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या वतीने दि.०१ जानेवारी २०२६ रोजी पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ' बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरीसाठी तयारी कशी करावी ' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे व साधन व्यक्ती म्हणून बेंगलोर येथील एआयएसआरई डेलॉईटचे पलक चौहान,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू,कार्यक्रम समन्वयक प्रा.वैभव कुलकर्णी,प्रा.सुमित जोशी,दीप बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी साधन व्यक्ती पलक चौहान यांनी या सेमिनारचे उद्दिष्ट सांगताना असे म्हणाल्या की,बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (चछ्ठी) यशस्वी रोजगारासाठी पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना उद्योग अपेक्षा,भरती प्रक्रिया आणि आवश्यक व्यावसायिक कौशल्यांबद्दल जागरूकता वाढविणे गरजेचे आहे.अभियोग्यता चाचण्या, तांत्रिक मुलाखती,एचआर फेऱ्या,संवाद कौशल्ये,रिज्युम बिल्डिंग आणि कामाच्या ठिकाणी शिष्टाचार तसेच शैक्षणिक ज्ञान आणि कॉर्पोरेट आवश्यकतांमधील अंतर भरून काढण्यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.विद्यार्थ्यांना जागतिक क्षमता, अनुकूलता आणि आंतरराष्ट्रीय नोकरी बाजारात आत्मविश्वासाने स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक मानसिकता विकसित करण्यास प्रेरित करणे हे देखील उद्दिष्ट या सेमिनारमधून साध्य होईल.

प्रास्ताविक व आभार आणि सूत्रसंचालन डॉ.रोहिणी शिंदे यांनी केले.प्रा.वैभव कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करून दिला.याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बी. एस्सी.सी.एस.द्वितीय,तृतीय आणि बी.एस्सी.ए.आय.व एम.एल.प्रथम वर्षाचे असे एकूण १२९ विद्यार्थी सहभागी झालेले होते.

### फुले माई ..

फुलेसावित्री तळमळ
ज्ञानार्जन इच्छाप्रखर
भिडेवाडा शाळाखुले
ज्ञाना सजविले मखर

शाळेस्तव द्रव्यअर्जन
अर्धी खाऊन भाकर
सावित्रीच्या लेकी बने
आम्ही खातो साखर

आपली प्रयास फळे
नारी विभूषित शिखर
तू सोसे निंदानालस्ती
आज जगतो सुखकर

कुणी फेके राडा शेण
शिव्या शाप ते कंकर
क्रांतीज्योत उजळली
वादळात त्या भयंकर

सांभाळली ममत्वाने
विधवाअनौरस लेकरं
रूढी परंपरा भेदताना
सनातनी देती ठोकर

भ्रूणहत्या बालविवाह
समाजा करी पोखर
ज्योतीबासमवेत लढा
अद्वितीय तो खरोखर

कार्य तुझे अमर राही
यावद् चंद्रमादिवाकर
तुम्हां नमन करावया
कमी पडे सहस्त्र कर

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# राजा नारायणलाल लाहोटी विद्यालयाचे स्नेहसंमेलन संपन्न!

## शिवोहम: प्रतिभा आणि परंपरेचा दिव्य उत्सव

**लातूर/प्रतिनिधी :** राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, लातूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा वार्षिक सामाजिक स्नेहसंमेलन दिनांक २६ व २७ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात व सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाला.

स्नेहसंमेलनाचे आयोजन दोन दिवस करण्यात आले होते. २६ डिसेंबर रोजी प्राथमिक विभागासाठी, तर २७ डिसेंबर रोजी माध्यमिक विभागासाठी कार्यक्रम घेण्यात आला. यंदाच्या स्नेहसंमेलनाची संकल्पना डक्षतजक-च अशी असून ती भगवान शंकरांना अर्पण करण्यात आली होती. या संकल्पनेतून आध्यात्मिकता, शक्ती व सांस्कृतिक मूल्ये सादर करण्यात आली.

२६ डिसेंबर रोजी झालेल्या प्राथमिक विभागाच्या कार्यक्रमासाठी डॉ. श्री बाबासाहेब ठोंबरेजी, अधिष्ठाता व प्राचार्य, शासकीय कृषी महाविद्यालय, लातूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. २७ डिसेंबर रोजी माध्यमिक विभागाच्या कार्यक्रमासाठी श्री संजय पानसरेजी, आयकर अधिकारी, लातूर हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले.दोन दिवसीय स्नेहसंमेलनात प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन गटांचे सादरीकरण करण्यात आले.अध्यात्मिकता हा मानवी जीवनाचा पाया असून त्याचे आचरण करणे ही फलश्रुती असते.याच उद्देशाने विद्यार्थी जीवनात मूल्यांचे अधिष्ठान होण्यासाठी अशा अभिनव संकल्पना घेऊन दरवर्षीच विद्यालय ललित कला संगमचे आयोजन करते.

स्वागतद्वारावरील मनोवेधक सजावट, महाकाल देखावा, समुद्रमंथन, कैलासाधिपती शिव गीतांची निवड, सुंदर नृत्याविष्कार, नाटकातील प्रभावी संवाद, उत्कृष्ट ध्वनी दिग्दर्शन, सुंदर वेशभूषा, प्रभावी सुत्रसंचलन, प्रेक्षकांचा उत्साहपूर्ण प्रतिसाद हीच या ललित कला संगमाची विशेष आकर्षणे ठरली.

लोकाभिरामं श्रीराम आणि कृष्णन वन्दे जगद्गुरु शिवोहम ही मुख्य संकल्पना घेऊन विद्यालयाने ललित कला संगम या वार्षिक स्नेहसंमेलनातील उत्कृष्ट सादरीकरण केले. ऑर्केस्ट्रा, शिवप्राकट्य, दक्षवध, श्रीगणेश जन्म, सतीविवाह, शिवोहम, गंगावतरण, समुद्रमंथन, त्रिपुरासूर वध, शिवभक्त रावण, कालभैरव जन्म, शिव तांडव अशाक्रमाने ही सुंदर शिवकथा कलाविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केला. अद्वैत तत्वज्ञानाचे प्रतिपादन करणारा संन्सस्थ भगवत्पाद शंकराचार्य अवतार संस्कृत नाटकातून उत्कृष्ट अभिनयातून साकारला. गोकर्ण महाबळेश्वर ही सुंदर कथा मराठी नाटकातून विद्यार्थ्यांनी साकारली.

वार्षिक दिन कार्यक्रमासाठी श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थाचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री राजा लक्ष्मीरमणजी लाहोटी हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थाचे अध्यक्ष श्री शैलेश लाहोटीजी यांनी भूषविले. तसेच शाळेचे अध्यक्ष श्री आनंदजी लाहोटी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन शाळेचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडले. शाळेचे निबंधक श्री प्रविणजी शिवणगीकर यांनी कार्यक्रमाच्या व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.

विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्यप्रयोग व संगीताच्या माध्यमातून SHIVOH-M ही संकल्पना प्रभावीपणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे पाहुणे, पालक व उपस्थितांनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले.

### Name of change Declaration

I HAVE CHANGE MY NAME FROM NABILAL MAHETABSAB MASULDAR TO NABISAB MAHETABSAB MASULDAR HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE. NABISAB MAHETABSAB MASULDAR IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: NABILAL MAHETABSAB MASULDAR

NEW NAME: NABISAB MAHETABSAB MASULDAR

ADDRESS: HAIDAR MANJIL BEHIND NAKA NO 1 ,SHIVAJI NAGAR NILANGA,LATUR,MAHARASHTRA-413521

### Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SYED YUSUF BADIUZAMA . TO SYED YOUSUF BADIUZZAMA Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SYED YOUSUF BADIUZZAMA. will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- SYED YUSUF BADIUZAMA

NEW NAME:- SYED YOUSUF BADIUZZAMA

Address :- NEW KHATIB COLONY SHELHAL ROAD UDGIR.TQ.UDGIR.DIST. LATUR -413517

AADHAR NO.- 8432 9563 8779

Mob. No.-7083141619

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६